SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बंडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं.7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २०.०७.२०२६ | अंक नं. ०९४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठला.. हरिओम विठ्ठला..
आषाढी एकादशीच्या महाउपवासासाठी
राजमोती साबुदाना
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
RAJ MOTI
-: स्टॉकिस्ट :-
मे. कांतीलाल प्रेमचंद शिंगवी
दाळ मंडई, अहमदनगर.
फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले खास आपल्या लाडक्या लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैंजण, वाळे, तोडे, मग आणि बरंच काही..

## पथदिवे बंद पडल्याने शहरात अंधाराचे साम्राज्य

### रात्री नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

नगर – शहरातील अनेक रस्त्यांवरील पथदिवे बंद पडल्याने शहरातील विविध भागात रात्री अंधाराचे साम्राज्य पसरते. त्यामुळे रात्री प्रवास करताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाहनचालकांना तसेच पायी येणाऱ्या–जाणाऱ्या नागरिकांना रात्रीच्या अंधारात प्रवास करताना करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच अंधारामुळे चोरट्यांची भितीही वाढली आहे.

प्रभाग क्रमांक १७ मधील अमरधाम, रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पूल तसेच त्यालगतच्या नवीन पुलावरील अनेक स्ट्रीट लाईट्स मागील काही दिवसांपासून बंद पडल्या आहेत. या परिसरात रात्री अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, बंद पडलेले दिवे तात्काळ सुरू करण्याबरोबरच अधिक प्रकाशमान एलईडी स्ट्रीट लाईट्स बसविण्याची मागणी नगरसेवक मयूर बांगरे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे, *(पुढील मजकूर पान २ वर)*

## नगरमध्ये तब्बल ३१ लाख रूपयांचे एमडी ड्रग्स जप्त

### सावेडी उपनगरात कारवाई, कारसह तिघे ताब्यात, दोघे पसार

नगर – सावेडी उपनगरातील मिस्किनमळा परिसरात तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने १९ जुलै रोजी रात्री धडक कारवाई करत सुमारे ३१ लाख रुपये किमतीचे १५० ते १६० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त केले. या कारवाईत संशयास्पद विना क्रमांकाच्या स्विफ्ट कारसह तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, वाहनातील अन्य दोघे संशयित पसार झाले आहेत. जिल्ह्यात एकाच कारवाईत एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन जप्त होण्याची ही पहिलीच मोठी घटना मानली जात आहे. या कारवाईत एकूण ३६ लाख ३९ हजार ८७४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मेफेड्रोन हा अंमलीपदार्थ बाळगणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक

तोफखाना पोलिसांचे गुन्हे शोध पथक मिस्किनमळा परिसरात गस्त घालत असताना विनाक्रमांकाची स्विफ्ट कार संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वेग वाढवून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून वाहन अडविले. कारवाईची चाहूल लागताच वाहनातील दोघे जण पसार झाले. तर झिशान शौकत सय्यद, रेहान जावेद शेख आणि वसीम खलील बागबान या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यानंतर वाहनाची कसून झडती घेतली असता १५० ते १६० ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ आढळून आला. तसेच पिस्तुलासारखे दिसणारे एक लायटर, एक एअर गन, मास्क, कटावणी आणि दरोडा टाकण्यासाठी वापरले जाणारे अन्य साहित्यही पोलिसांनी जप्त केले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तोफखाना पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले. प्राथमिक तपासणीत जप्त केलेला पदार्थ मेफेड्रोन असल्याचे स्पष्ट झाले असून, त्याची काळ्या बाजारातील किंमत सुमारे ३० ते ३२ लाख रुपये असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात वसीम खलील बागवान (वय ३८, रा. पिंजर गल्ली, चाचा मेससमोर), झिशान शौकत सय्यद (वय २७, रा. सहारा कॉलनी, मुकुंदनगर) आणि रेहान जावेद शेख (वय २४, रा. छोटी मशीद, मुकुंदनगर) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर जमीर निसार शेख आणि एक अनोळखी इसम पसार असून, त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. अमली पदार्थांचा पुरवठा कोणत्या रॅकेटमार्फत होत होता, जप्त साहित्याचा नेमका वापर कशासाठी होणार होता आणि पसार आरोपींची भूमिका काय आहे, याचा तपास पोलिस करत आहेत.

## पायी जाणाऱ्या महिलेचे गंठण दुचाकीस्वारांनी हिसकावले

नगर – सावेडी उपनगरातील नंदनवननगर परिसरात रस्त्याने पायी जाणाऱ्या वृध्द महिलेच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपये किमंतीचे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण दुचाकीस्वारांनी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे.

याबाबत सिसिलिया सुरेश त्रिभुवन (वय ६१, रा. नंदनवन नगर, बंधन लॉनच्या पाठीमागे) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.१७ जुलै रोजी रात्री ८.१५ वाजता, फिर्यादी या त्यांच्या पतींसोबत फिरण्यासाठी बाहेर गेल्या होत्या. फिरून घरी परतत असताना जी.एम. कार सजावट दुकानासमोरील रस्ता, बंधन लॉनजवळ, नंदनवन नगर येथे भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीवरील दोन इसमांनी त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने ओढून तोडले आणि क्षणार्धात घटनास्थळावरून राजवीर चौकाच्या दिशेने पळ काढला.

घटनेनंतर महिलेने आरडाओरडा केला. मात्र, तोपर्यंत आरोपी दुचाकीवरून फरार झाले होते. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्लॉट विकणे आहे
अ.नगर, सावेडी, ऐक्य नगर येथील प्राईम लोकेशन,रोडटच
क्लियर टायटल असलेला ५६० चौ.मीटरचा प्लॉट
व्यवसायिक तसेच निवासासाठी किंवा भविष्यातील उत्कृष्ट गुंतवणुकी करिता
त्वरीत व्यवहार इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा
संपर्क-रमेश तांदळे मो.9881199200

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

तृतीय स्मृतिगंध
आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
स्व. प्रकाशजी बन्सीलालजी चोरडिया (खरवंडीवाला)
जन्म : दि. ३१/१२/१९६१ । स्व. दि. २०/७/२०२३
आपल्या स्मृतीस विनम्र आदरांजली..!
* दुःखांकित *
अमृतलाल बन्सीलाल चोरडिया, प्रणय प्रकाश चोरडिया, तुषार संपतलाल चोरडिया,
सागर अमृतलाल चोरडिया, आकाश अमृतलाल चोरडिया
सार्थ, परी,हार्दिक, साईशा
सौ. ज्योत्स्ना हितेश लुंकड, सौ. पूजा संकेत बेदमुथ्था
समस्त चोरडिया परिवार (खरवंडीवाला)
* फर्म – दलाल प्रकाश चोरडिया/दलाल आकाश चोरडिया, प्रकाश ॲग्रो फुडस्, अहिल्यानगर

CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

सातवे पुण्यस्मरण
आठवण तुमची
प्रत्येक क्षणाला,
व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या
आठवणी आमच्या मनात..
आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली..
कै.चमकराव गणपतराव तनपुरे
सेवानिवृत्त जनरल मॅनेजर, जिल्हा खरेदी विक्री संघ,अहमदनगर
सेवानिवृत्त जनरल मॅनेजर, जिल्हा सहकारी बँक, अहमदनगर
मृत्यू : आषाढ कृ.॥ पंचमी शके १९४१, दि.२१ जुलै २०१९
* दुःखांकित *
श्रीमती सुनंदा चमकराव तनपुरे
श्री.उदय चमकराव तनपुरे | सौ.नयना उदय तनपुरे
श्री. उमेश चमकराव तनपुरे | सौ. वैशाली उमेश तनपुरे
डॉ.सौ.शुभांगी राजेंद्र शिंदे | डॉ. राजेंद्र रामचंद्र शिंदे
समस्त तनपुरे परिवार
तनपुरे निवास, बंगला नं.४१, पूनम मोतीनगर मार्केटयार्ड, अहमदनगर

भावपूर्ण श्रध्दांजली
काळाचा महिमा काळच जाणे,
कठीण तुमचे अचानक जाणे,
आजही घुमतो स्वर तुमचा कानी,
वाहताना श्रध्दांजली डोळ्यात येते पाणी..
कै.साहेबराव बबनराव खैरे
स्व.दि.१२/०७/२०२६
कै.साहेबराव बबनराव खैरे
* दशक्रिया विधी *
मंगळवार दि. २१/०७/२०२६ रोजी
८ वा. होईल. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
दुःखांकित
श्रीमती लक्ष्मीबाई साहेबराव खैरे (पत्नी)
श्री. दिपक साहेबराव खैरे (मुलगा) मा. नगरसेवक
श्री. सतीश साहेबराव खैरे (मुलगा)
(भाऊ, मुली, पुतणे, नातू, सुना, नाती, जावई, परतुंड)
समस्त खैरे परिवार
प्रवचन सेवा : ह.भ.प.अमित महाराज धाडगे

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक


# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

नगर - राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या न्याय हक्कासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कथित अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देत सरकारने विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.



विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे पदाधिकारी.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील व देशातील लाखो विद्यार्थी आणि युवकांचे भविष्य धोक्यात आलेले असतानाही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. आजचा विद्यार्थी आणि युवक हा देशाचा भविष्यकाळ असूनही सरकारचे शैक्षणिक धोरण आणि युवकांच्या प्रश्नांबाबतचे धोरण अत्यंत उदासीन व निराशाजनक असल्याचा आरोप करण्यात आला.

स्पर्धा परीक्षांचे वारंवार फुटणारे पेपर, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी, पोलीस भरतीतील उमेदवारांवर होत असलेला अन्याय आणि विद्यार्थी-युवकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने केलेले दुर्लक्ष यामुळे राज्यभरात संतापाची लाट निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी सरकार जबाबदारी झटकत असल्याची टीकाही करण्यात आली.

लोकशाही मार्गाने न्याय हक्कांसाठी आंदोलन करणारे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्या आंदोलनालाही सरकारकडून अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. लोकशाहीत जनभावनांचा असा अनादर करणे चिंताजनक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ आणि मानसिक तणावामुळे देशात अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून, या पार्श्वभूमीवर नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. मात्र सरकारने अद्याप त्यांचा राजीनामा न घेतल्याने विद्यार्थी आणि युवकांच्या प्रश्नांबाबत सरकारची भूमिका संवेदनाहीन असल्याची भावना समाजात निर्माण झाली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

या सर्व विद्यार्थीविरोधी व जनविरोधी धोरणांचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, जिल्हा उपाध्यक्ष किसनराव लोटके, कार्याध्यक्ष नामदेवराव पवार, विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, युवक जिल्हाध्यक्ष प्रकाश पोटे, फारुख रंगरेज, उद्धवराव दुसुंगे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, समीर पठाण, युवक अध्यक्ष रोहन शेलार, मतीन शेख, परवेज शेख, असीर शेख, ओंकार हलगे, सुशांत भापकर, अजहर शेख, आशिष सूर्यवंशी, किरण सोनटक्के, गणेश दरोडे, मोसिन पठाण आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा. ब्लॅकलिस्टमध्ये असलेल्या कंपन्या किंवा त्यांच्या संचालकांशी संबंधित संस्थांना परीक्षा घेण्याचे कोणतेही काम देऊ नये. नॅशनल टेस्टिंग एजन्सी आणि संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील सर्व त्रुटी दूर करून पारदर्शक व विश्वासार्ह परीक्षा प्रणाली लागू करावी. महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा कायमस्वरूपी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात. पोलीस भरती प्रक्रियेतील कथित अन्याय व त्रुटी दूर करून पात्र उमेदवारांना त्वरित न्याय द्यावा. विद्यार्थी व युवकांच्या प्रलंबित प्रश्नांवर सरकारने तातडीने ठोस आणि सकारात्मक निर्णय जाहीर करावेत.आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

या सर्व मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

## शहरात अंधाराचे साम्राज्य

(पान १ वरुन)

अमरधाम परिसरातील रेल्वे स्टेशन रोड हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग आहे. या मार्गावरून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांसह भारतीय सैन्याच्या वाहनांची नियमित ये-जा होत असते. तसेच मालधक्का आणि ट्रान्सपोर्ट व्यवसायाशी संबंधित जड मालवाहू ट्रकांची वाहतूकही मोठ्या प्रमाणावर याच मार्गाने केली जाते. याशिवाय दुचाकी, चारचाकी वाहने तसेच पादचाऱ्यांची दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने या मार्गाचे महत्त्व अधिक आहे.

मात्र, पुलावरील स्ट्रीट लाईट्स बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारमय होत असून वाहनचालकांना मार्गक्रमण करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंधारामुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांकडूनही याबाबत सातत्याने तक्रारी करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर बंद पडलेल्या स्ट्रीट लाईट्सची तात्काळ दुरुस्ती करून त्या पूर्ववत सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत आणि संपूर्ण परिसर अधिक प्रकाशमान व्हावा यासाठी जुन्या दिव्यांच्या जागी आधुनिक, ऊर्जा कार्यक्षम व अधिक उजेड देणाऱ्या एलईडी स्ट्रीट लाईट्स बसविण्याची मागणीही नगरसेवक मयूर बांगरे यांनी केली आहे. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाला तातडीने आवश्यक सूचना देत नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकांसह नगरसेवक मयूर बांगरे यांनी व्यक्त केली आहे.

## शिर्डीत प्राणघातक हल्ल्यात जखमी महिलेचा मृत्यू

शिर्डी - लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीतील साईबाबा मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर १९ जुलै रोजी रात्री झालेल्या एका जीवघेण्या चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या फळविक्रेत्या महिलेचा २० जुलै रोजी सकाळी उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. गजबजलेल्या आणि अतिसंवेदनशील मानल्या जाणाऱ्या मंदिर परिसरात घडलेल्या या हत्येमुळे संपूर्ण शिर्डी शहर हादरले असून सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शिर्डीतील साई मंदिराच्या गेट क्रमांक ४ समोर हा संपूर्ण प्रकार घडला. या परिसरात जयश्री साईनाथ क्षीरसागर (वय ३०) या महिला गेल्या अनेक वर्षांपासून फळे विकण्याचा व्यवसाय करत होत्या. याच परिसरात स्टीकर विकणाऱ्या दोन तरुणींसोबत त्यांचा १९ जुलै रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास व्यवसाय करण्याच्या जागेवरून वाद झाला. हा किरकोळ वाद काही वेळातच अत्यंत विकोपाला गेला. रागाच्या भरात या दोन्ही तरुणींनी आपल्यासमोरील जयश्री यांच्यावर धारदार चाकूने सपासप वार करत प्राणघातक हल्ला केला.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे मंदिर परिसरात एकच पळापळ आणि खळबळ उडाली. गंभीर जखमी झालेल्या जयश्री यांना स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने शिर्डी येथील साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र त्यांची प्रकृती खालावत गेली आणि २० जुलै रोजी सकाळी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

भरगर्दीच्या ठिकाणी घडलेल्या या गुन्ह्याची दखल घेत शिर्डी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन्ही संशयित तरुणींना ताब्यात घेतले आहे. जयश्री यांच्या मृत्यूनंतर शिर्डी पोलिसांनी दोन्ही आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या साई मंदिर परिसरात अशा प्रकारे हत्या झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शिर्डी पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून घटनेच्या वेळी हजर असलेल्या प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले जात आहेत.

## २ ऑगस्ट रोजी बालकलाकारांसाठी मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सव

नगर - बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर जिल्हा शाखेतर्फे बाल कलाकारांसाठी दरवर्षीप्रमाणे मानसी भणगे स्मृती राज्यस्तरीय नाट्यछटा महोत्सव २०२६ जाहीर झाला असून २ ऑगस्ट रोजी बहुउद्देशीय सभागृह, पेमराज सारडा महाविद्यालय येथे साजरा करण्यात येईल. स्पर्धेचे हे सातवे वर्ष असून या माध्यमातून बालकलाकारांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा आणि त्यांच्यातील स्टेज कॉन्फिडन्स वाढवण्याचा प्रयत्न असेल अशी माहिती प्रमुख कार्यवाह शैलेश देशमुख यांनी दिली.

सदर स्पर्धा इयत्ता १ली ते ३री, ४थी ते ७वी आणि ८ वी ते १० वी या ३ गटात होणार असून प्रवेश शुल्कासह फॉर्म भरण्याची शेवटची तारीख १ ऑगस्ट असेल. नाट्यछटेचा विषय हा स्पर्धकाच्या वयोमानास साजेसा असावा तसेच विद्यार्थ्यांचे पाठांतर, स्पष्ट शब्दोच्चार, सभाधिटपणा, वाचिक व अंगीक अभिनय आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद यावर गुण दिले जातील, सदारीकरणास वेळेची मर्यादाही असेल अशी नियमावली स्पर्धा प्रमुख श्रिया देशमुख यांनी सांगितली.

प्रत्येक गटातून सर्वोत्कृष्ट तीन आणि उत्तम तीन अशी रोख पारितोषिकांसह स्मृतिचिन्ह आणि उत्तेजनार्थ पारितोषिकेही देण्यात येणार आहेत. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी प्रसाद भणगे (९२२५३१६६१५), शैलेश देशमुख (९८२२९७१२९२), श्रिया देशमुख (८२७५४३८२०२) यांच्याशी संपर्क करावा.

स्पर्धा यशस्वीतेसाठी देवीप्रसाद सोहोनी, तेजा पाठक, तेजस अतितकर, सुजाता पायमोडे, सपना साळुंके, सोनाली दरेकर, टीना इंगळे, विराज अडगटला, ऋतुजा पाठक, अविनाश बोधले, प्रशांत सूर्यवंशी, सागर अलचेट्टी आदी कार्यशील असून जिल्ह्यातील बाल कलाकारांनी सहभागी होत महोत्सवाचा आनंद द्विगुणित करावा असे आवाहन बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके आणि कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी यांनी केले आहे.

## बुरुडगाव येथे पतीकडून पत्नीची बेदम मारहाण करून हत्या

नगर - कौटुंबिक वादातून पतीने पत्नीला मारहाण करून तिचे डोके भिंतीवर आपटत हत्या केल्याची घटना १८ जुलै रोजी मध्यरात्री तांबे मळा, बुरुडगाव येथे घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी पतीला अवघ्या काही तासांत अटक केली आहे.

मनिषा खरात या आपल्या पती सुभाष खरात याच्यासोबत तांबे मळा, बुरुडगाव येथे भाडोत्री राहत होत्या. दोघेही मूळचे सुशीवडगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील असून उदरनिर्वाहासाठी नगर येथे वास्तव्यास होते.

त्यांच्या दोघांमध्ये घरगुती कारणांवरून वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे. शनिवारी (दि. १८) मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास दोघांमध्ये पुन्हा जोरदार वाद झाला. त्यावेळी आरोपी सुभाष खरात याने पत्नी मनिषा यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांचे डोके भिंतीवर आपटून गंभीर दुखापत केली. मारहाणीनंतर त्याने पत्नीला घराबाहेर टाकून घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, नातेवाईकांनी ही माहिती मनिषा यांचा भाऊ गणेश अशोक घोडके यांना दिली. ते तातडीने घटनास्थळी पोहोचले असता मनिषा या बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या आढळून आल्या. त्यांनी तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना पाचारण केले तसेच रुग्णवाहिकेतून त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले.

मात्र, वैद्यकीय अधिकार्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेप्रकरणी गणेश घोडके यांच्या फिर्यादीवरून आरोपी सुभाष रखमाजी खरात याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली आणि आरोपीचा शोध घेऊन त्याला काही तासांत अटक केली. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, मंगेश खरमाळे, विक्रांत भालसिंग आणि नितीन शिंदे यांनी केली.

## ‘मतदार यादी पुनरिक्षण आढावा बैठकीत’ तक्रारींचा पाऊस; मतदार यादीसाठी पुनरिक्षण काळजीपूर्वक करण्याचे आदेश

नगर - मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामाच्या आढावा बैठकीमध्ये उपस्थित प्रतिनिधींनी आपापल्या भागात पुनरीक्षण करताना येणाऱ्या अनेक अडचणी व त्रुटींच्या गंभीर तक्रारी करून अधिकारी काम चुकीचे काम करत आहेत, मशिदींमध्ये मोठ्याप्रमाणात नोंदणीचे काम होत आहे, पत्ता बदलेल्यांना न शोधताच त्यांचे नाव कमी करत असल्याच्या अनेक गंभीर तक्रारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समोर मांडण्यात आल्या. या तक्रारींची दखल अधिकाऱ्यांनी तातडीने घेऊन त्या सोडवाव्यात, असे आदेश मंत्री विखे पाटील यांनी दिले.


अहिल्यानगर शहर मतदारसंघातील मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. समवेत आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, प्रांताधिकारी सुधीर पाटील, विनायक देशमुख आदी.

आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून अहिल्यानगर शहर मतदारसंघातील मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामाची आढावा बैठक १८ जुलै रोजी सायंकाळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार सभागृह येथे झाली. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार ढवळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, नगरसेवक, शहरातील सर्व बूथ स्तरावरील नियुक्त प्रतिनिधी (बीएलए १) उपस्थित होते.

मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेत नाव वगळले जाणार नाही याची काळजी सर्व नागरिकांनी जागरुतेने घेणे आवश्यक आहे. राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी एसआयआर हे रोडमॅप ठरणार असल्याने याचे काम आधीक जागृतीने, गांभीर्याने व योग्यपणे होणे गरजेचे आहे. यामध्ये घुसखोरांची नोंदणी होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठी बूथ प्रतिनिधींनी विशेष वेळ देऊन जागरूकतेने आपापल्या भागात काम करावे. बैठकीमध्ये ज्या तक्रारी आल्या आहेत त्याचे तातडीने निरासरण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी योग्य उपाययोजना राबवाव्यात. शहराची परिपूर्ण व पारदर्शक मतदार यादी तयार होण्यासाठी सर्वांनी काळजीपूर्वक योगदान द्यावे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे यांनी करून मतदान केंद्र अधिकाऱ्यांमध्ये अनास्था असून त्यांनी ती दूर करून कामात सुधारणा करणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक नगरसेवक, बुध प्रतिनिधी यांनी विशेष लक्ष घालून बीएलओ यांच्याकडून काम करून घ्यावे व मॅपिंगचा वेग वाढवावा अशा सूचनाही मंत्री विखे यांनी यावेळी केल्या.

मंत्री विखे म्हणाले, ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मतदार पुनरीक्षण मध्ये बऱ्याच अडचणी येत आहे. नगर शहरामध्ये सावेडी, नालेगाव व माळीवाडा भागात पुनरीक्षणचे काम कमी झाले आहे. तर काही भागांमध्ये हे काम ९९% झाले आहे. आता मुदत वाढल्याने सर्व अधिकाऱ्यांनी व बूथ प्रतिनिधींनी मॅपिंगचे काम योग्यपणे व वेगाने होईल यांची दक्षता घावी. काही भागांमध्ये काही लोक विशिष्ट धर्माच्या नागरिकांना शासकीय योजनांच्या सवलती मिळाव्यात यासाठी पुढाकार घेऊन मॅपिंग करत आहेत. हे अत्यंत गंभीर असून अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष द्यावे. मॅपिंगचे काम कुठल्याही धार्मिक स्थळी होणार नाही याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी. धार्मिक स्थळी मॅपिंगचे काम झाल्यास तातडीने माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आदेश यावेळी मंत्री यांनी दिले अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री विखे पुढे म्हणाले, पश्चिम बंगालमध्ये चांगल्या पद्धतीने पुनरीक्षण झाल्याने लाखो घुसखोरांना बाहेर काढल्याने तेथे चांगल्या वातावरणात निवडणूक पार पडल्या. आता पूर्ण देशांमध्ये याच पद्धतीने मतदार यादीची स्वच्छता होणे आवश्यक आहे. नगर शहरात आमदार संग्राम जगताप यांनी लक्ष घालून अधिकाऱ्यांवर अंकुश ठेवून घुसखुरांची नोंदणी होणार नाही याकडे लक्ष द्यावे. एसआयआरची जी मूळ कल्पना आहे, त्यानुसार काम करणे आवश्यक आहे. नगर शहरात पियुष जग्गी यांच्याप्रमाणे सर्वांनी शंभर टक्के काम आपापल्या भागात करावे, असेही आवाहन मंत्री विखे यांनी यावेळी केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, पूर्वपार परंपरेने चालत आलेल्या मतदार याद्यांमध्ये आता सुधारणा होणार आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने जागृकतेने आपले पुनरीक्षण करावे. नगर शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने त्यांचे नाव शहरात व गावात दोन्ही ठिकाणी आहे. असे दुबार मतदार यामुळे कमी होतील. नगर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोर असल्याची माहिती मिळाली आहे. अशांना शोधून त्यांची नोंदणी होणार नाही तसेच बोगस जन्म दाखले असल्यांचीही नोंदणी होणार नाही यांची दक्षता अधिकाऱ्यांनी व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी घ्यावी. मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक झाल्याने या कामातील बऱ्याचशा त्रुटी पुढे आल्याने त्या दूर होतील व नगर शहराची पारदर्शक मतदार यादी तयार होईल.

बैठकीच्या सुरुवातीला प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी प्रास्ताविकात मतदार पुनर्नरीक्षण कामाची आतापर्यंत झालेल्या कामाची सविस्तर माहिती दिली. तसेच उपस्थित बूथ प्रतिनिधींच्या तक्रारी व शंकांचे नीरासन केले. प्रारंभी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी स्वागत केले. बैठकीचे सूत्रसंचालन भाजपा शहर जिल्हा उपाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी केले. जिल्हा सरचिटणीस महेश नामदे यांनी आभार मानले. यावेळी व्यासपीठावर विनायक देशमुख, प्रा. माणिक विधाते, निखिल वारे, प्रिया जानवे, बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, बाबासाहेब सानप, रवींद्र बारस्कर, रुद्रेश अंबाडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मंगेश पुरोहित यांचे अल्प आजाराने निधन



नगर - विनायकनगर येथील रहिवासी कु. मंगेश उदयराम पुरोहित (वय ३६) यांचे १९ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## राजलक्ष्मी कामळत यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या मातोश्री राजलक्ष्मी कामळत (वय ९१) यांचे २० जुलै रोजी पहाटे केरळ राज्यातील चलाकुडी येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने टायरवाले कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली.

चलाकुडी (केरळ) येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. स्वर्गीय राजलक्ष्मी कामळत यांना समाजकार्याची विशेष आवड होती. आपल्या गावामध्ये त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. साधेपणा, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली आत्मीयता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## अमित कोलते यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील रहिवासी अमित श्रीधर कोलते (वय ४४) यांचे १९ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई - वडील, पत्नी, एक भाऊ, एक बहिण, एक मुलगा, दोन मुली, चुलते, पुतणे असा परिवार आहे. ते शेतकरी सेवा केंद्राचे मालक श्रीधर भाऊराव कोलते यांचे थोरले चिरंजीव, अ‍ॅड.अमोल कोलते यांचे बंधू, चि.विराज कोलते यांचे वडील व चि.श्रीराज कोलते यांचे चुलते होत.



## हस्तीमल मुनोत यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त पालवी वार्षिक अंकाचे प्रकाशन

नगर - ज्येष्ठ सहकार नेते, समाजसेवक तथा श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्टचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्सच्या पालवी वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले.


पालवी वार्षिक अंकाच्या प्रकाशनप्रसंगी हस्तीमल मुनोत, किशोर मुनोत, प्रा. डॉ. स्वाती मुनोत, सुजाता मुनोत, पूजा मुनोत तसेच हर्ष जैन उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने हस्तीमल मुनोत यांच्या वाढदिवसानिमित्त पालवी वार्षिक अंक प्रकाशित करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जोपासली जात आहे. दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक आणि समकालीन विषयांवर आधारित या अंकाचे संपादन केले जाते. यंदाच्या अंकासाठी महिला सक्षमीकरण ही मध्यवर्ती संकल्पना निवडण्यात आली असून, या विषयाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभ्यासपूर्ण, वैचारिक व प्रेरणादायी लेख त्यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील लेखनकौशल्य विकसित करणे आणि सामाजिक विषयांकडे पाहण्याची व्यापक व संवेदनशील दृष्टी निर्माण करणे, हा पालवीच्या प्रकाशनामागील प्रमुख उद्देश आहे. या वार्षिक अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लेखनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असून त्यांच्या विचारांना आणि अभिव्यक्तीला प्रोत्साहन मिळत आहे.

हस्तीमल मुनोत यांनी सहकार, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेने शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त ज्ञान, विचार आणि सामाजिक जाणीव जागृत करणाऱ्या पालवी वार्षिक अंकाचे प्रकाशन ही महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा कायम राखण्यात आली.

पालवी वार्षिक अंकाच्या प्रकाशनप्रसंगी संस्थेचे किशोर मुनोत, कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत, सुजाता मुनोत, पूजा मुनोत तसेच हर्ष जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पालवीच्या संपादक डॉ. वर्षा किर्तने यांच्यासह डॉ. खोपटीकर, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चाकवते, प्रा. रोहिणी क्षीरसागर आणि हर्षाली रासकर आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी दिनचर्या

'आरोग्यदायी दिनचर्या'निरोगी शरीर आणि आनंदी मन यासाठी शिस्तबद्ध दिनचर्या हाच खरा पाया आहे. प्राचीन काळापासून ऋषी-मुनींनीही लवकर उठणे आणि निसर्गाशी जोडलेले जीवन याला महत्व दिले आहे. आणि आता आधुनिक विज्ञानानेही याला 'लाइफस्टाइल मेडिसिन' चा दर्जा दिला आहे. सकाळी लवकर उठणे, व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप या चार गोष्टींनी आपली रोगप्रतिकारशक्ती वाढते. यातील खास 'योगा आणि प्राणायाम' नावाचा भाग तणाव कमी करतो, पचनक्रिया सुधारतो आणि शरीरातील ऊर्जा वाढवण्यास मदत करतो. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि हृदय निरोगी ठेवण्यासाठी ही दिनचर्या रामबाण आहे. कारण एका तासाच्या व्यायामाने दिवसभराचे चयापचय जवळपास पूर्ण होते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी ही दिनचर्या उत्तम आहे, कारण यात कॅलरी बर्न जास्त आणि आळस कमी होतो. वेळेवर जेवणामुळे पोटाचे विकार कमी होतात तर पुरेशी झोप घेतल्याने स्मरणशक्ती आणि कामाची कार्यक्षमता वाढते. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, त्वचा तजेलदार करण्यासाठी आणि केसांच्या आरोग्यासाठीही पाणी आणि फळे महत्वाची ठरतात. आयुर्वेदात पहाटेची वेळ ही 'संजीवनी वेळ' मानली आहे. गोड-तिखट खाण्याऐवजी घरचे सात्विक अन्न, हिरव्या पालेभाज्या, डाळी आणि फळे अशा अनेक प्रकारे आहारात समाविष्ट करता येतात. महागड्या सप्लिमेंट्सपेक्षा शिस्तबद्ध दिनचर्या सहज, स्वस्त आणि आपल्या शरीरासाठी अधिक गुणकारी ठरते. थोडक्यात दिनचर्या: सकाळी ६ : उठून २ ग्लास कोमट पाणी + १५ मिनिटे योगा नाश्ता ८ : पोहे/उपमा/फळे + ड्रायफ्रूट्स दुपारी १ : २ पोळी, भाजी, डाळ, भात, ताक संध्याकाळी ६ : ३० मिनिटे चालणे रात्री ९ : हलके जेवण आणि १० वाजेपर्यंत झोपणे.

## पाककला

### चॉकलेट चिप्स ब्रेड पुडिंग

**साहित्य :** ब्रेड स्लाईस ६, दूध २ वाटी, कंडेन्स्ड मिल्क १/२ वाटी, अंडी २, साखर १/४ वाटी, व्हॅनिला इसेन्स १ चमचा, दालचिनी पूड १/४ चमचा, चॉकलेट चिप्स १/२ वाटी, बटर २ चमचे, मनुका २ चमचे

**कृती :** ब्रेडच्या कडा कापून त्याचे चौकोनी तुकडे करा. बेकिंग डिशला बटर लावा आणि त्यात ब्रेडचे तुकडे मोकळे ठेवा. त्यावर चॉकलेट चिप्स आणि मनुका पसरवा. एका भांड्यात दूध, कंडेन्स्ड मिल्क, अंडी, साखर, व्हॅनिला इसेन्स आणि दालचिनी पूड घालून चांगले फेटून घ्या. हे मिश्रण ब्रेडवर हळूहळू ओता जेणेकरून सगळा ब्रेड भिजेल. १० मिनिटे तसेच ठेवा. वरून थोडे बटरचे तुकडे टाका. ओव्हन १८० अंश सेल्सिअसवर १० मिनिटे प्रीहिट करा. डिश ओव्हनमध्ये ठेवून ३५ ४० मिनिटे बेक करा. वरचा भाग सोनेरी आणि खुसखुशीत होईपर्यंत भाजा. गरम-गरम चॉकलेट चिप्स ब्रेड पुडिंग व्हॅनिला आईस्क्रीम सोबत सर्व्ह करा. चहासोबत किंवा डेझर्ट म्हणून एकदम हटके पदार्थ तयार आहे.

## वास्तू

### मोबाईल चार्जिंग संबंधी

* घराच्या आग्नेय कोपऱ्यात मोबाईल, लॅपटॉप चार्ज करू नका. तिथे अग्नी तत्व असतं त्यामुळे वाद-तणाव वाढतात. पश्चिम दिशा चार्जिंगसाठी बेस्ट आहे.

* बेडच्या समोर मोठा आरसा ठेवू नका. रात्री झोपेत आरशात स्वतःचं प्रतिबिंब दिसलं तर झोप उडते आणि निगेटिव्ह एनर्जी वाढते. आरसा पूर्व किंवा उत्तर भिंतीवर लावा.

* स्वयंपाक करताना तोंड पूर्वेकडे असू द्या.

## सौंदर्य

* जास्त गोड आणि दूध-चहा मुळे पिंपल्स आणि स्किनवर रॅश येतात. त्याऐवजी हिरवा चहा, नारळ पाणी प्या.

* आठवड्यातून १ वेळा गरम पाण्याची वाफ डोक्याला द्या ५ मिनिटे. नंतर हलके खोबरेल तेल लावा. केस गळती कमी होते आणि चमक येते.

## सल्ला

ऑफिस/स्कूलसाठी रात्रीच डबा ठरवा. सकाळी फक्त गरम करायचा. जसे संध्याकाळी पोहे करण्यासाठी कांदा कापून ठेवणे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६

**दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, चित्रा २०।४९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ११ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात यश मिळेल; आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** जुन्या गुंतवणुकीतून नफा होईल; आरोग्यात सुधारणा होईल.

**मिथुन :** नवीन संधी मिळतील; वरिष्ठांकडून कौतुक होईल.

**कर्क :** कौटुंबिक आनंद मिळेल; चांगली बातमी समजेल.

**सिंह :** कामाचा ताण असेल; संध्याकाळी मन प्रसन्न राहील.

**कन्या :** धनलाभ होईल; नवीन ओळखी फायदेशीर ठरतील.

**तूळ :** आजचा दिवस शुभ आहे; अपूर्ण कामे पूर्ण होतील.

**वृश्चिक :** प्रवास घडेल; मनातील एखादी इच्छा पूर्ण होईल.


**धनु :** नशिबाची साथ आहे; व्यवसायात प्रगती होईल.

**मकर :** कामात स्थिरता येईल; आर्थिक नियोजन यशस्वी होईल.

**कुंभ :** मित्र आणि कुटुंबीयांची मदत मिळेल; नवीन उपक्रम सुरू होतील. जुने मित्र भेटतील.

**मीन :** मानसिक शांतता लाभेल; आजचा दिवस लाभदायक आहे.

# शब्दगंध क्र. ७४७७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) आश्चर्य; नवलाचे ३) हुंगण्याचा एक पदार्थ; तपकीर ६) ताप; पीडा; दुःख (विशेषत: सुनेला सासरी) ७) आश्चर्यकारक ८) एक शस्त्र; समशेर १०) हातोटी; कौशल्य १३) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा १५) उपाय; इलाज; विरोध १७) माळ; हार; तुलना; बरोबरी १८) भास्कर; रवि; सूर्य; दिनकर २०) अंगणात केले जाणारे शेणाच्या पाण्याचे सिंचन; पखरण २१) एक अत्यंत तलम सुती कापड

**उभे शब्द :-** १) जो कोणाचा शत्रू नाही व ज्याला कोणी शत्रू नाही असा २) क्षणिक; पातळ; तरल ३) नाव; गंधाचा टिळा ४) आदरातिथ्य; सन्मान ५) एक विषम संख्या ७) एक अमली पदार्थ ९) कुठेच सरळ नसलेला; अतिशय वाकडा ११) मौज; रंग; गायनातील एक राग १२) चारही कोन नव्वद अंशाचे व चारही बाजू समान असा चौकोन १४) आवरण; कवच; साल १५) एका ठिकाणाहून लांबवर चालत किंवा वाहनाने जाणे; टूर; सफर १६) एक प्रकारची मोटारगाडी १९) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे

**शब्दगंध क्र. ७४७६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ई | बा | बा | ■ | त | पा | स |
| मा | ■ | र | ग | डू | न | ■ | क |
| जि | त | का | ■ | ल | य | लू | ट |
| क | न | वा | ळू | ■ | ■ | त | ■ |
| ■ | म | ■ | ■ | स | ■ | ■ | आ |
| क | णी | क | ■ | रो | ज | गा | र |
| ड | ■ | रा | ज | व | ट | ■ | मा |
| बा | र | व | ■ | र | ■ | चो | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** दुसऱ्यांना मदत केल्याने मिळणारा आनंद हा जगातला सर्वात मोठा आनंद आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपल्याला स्वप्न का पडतात? झोपेत मेंदू काम करतो का?

रात्री झोप लागल्यावर आपण एका जादुई जगात जातो. कधी आपण राजा होतो, कधी उंच डोंगरावरून खाली पडतो, कधी शाळेची परिक्षा असते पण पेन्सिल सापडत नाही. सकाळी उठल्यावर काही स्वप्न आठवतात तर काही लगेच विसरतो. पण ही स्वप्ने येतात तरी कुठून? आणि खरोखर झोपेत आपला मेंदू झोपतो का? सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मेंदूची रोजची आवराआवर आणि स्वच्छता. दिवसभर आपण खूप काही पाहतो, बोलतो, खेळतो आणि शिकतो. शाळेतला धडा, मित्राशी झालेली भांडण, आईने केलेला आवडीचा पदार्थ, रस्त्यावर दिसलेली गाडी या सगळ्या लहान मोठ्या आठवणी मेंदूत साठतात. रात्री झोपेत मेंदू या सर्व माहितीला एका कपाटासारखे लावून ठेवतो.

जी माहिती उपयोगी आहे ती जपून ठेवतो आणि नको असलेली बाहेर फेकून देतो. ही आवराआवर चालू असताना मेंदूतील कोट्यवधी लहान पेशी एकमेकांना संदेश पाठवतात. याच संदेशांमधून रंगीबेरंगी चित्रे, आवाज आणि गोष्टी तयार होतात. त्यांनाच आपण स्वप्न म्हणतो. दुसरे मोठे कारण म्हणजे आपल्या मनातील भावना. दिवसा आपण काही बोलू शकत नाही, काही भीती वाटते, काही गोष्ट हवी असते पण मिळत नाही. या सर्व गोष्टी आपल्या मनाच्या आत दडून राहतात. झोपेत मात्र मेंदूला भीती नसते. तो त्या सर्व भावनांना चित्रांच्या स्वरूपात बाहेर काढतो. म्हणूनच परीक्षेच्या आधी पेपरचे स्वप्न पडते, नवीन ठिकाणी गेलो की तिथल्या गोष्टींचे स्वप्न पडते, किंवा कधी कधी खूप मजेशीर स्वप्नही पडते. काही वेळा स्वप्नात आपल्याला उत्तरही सापडते. कारण झोपेत मेंदू मोकळेपणाने विचार करू शकतो.तिसरे कारण म्हणजे शरीराची दुरुस्ती.

दिवसभर धावपळ केल्याने शरीर आणि मेंदू दोन्ही थकतात. झोपेत शरीरातील पेशी नव्याने तयार होतात. जखमा भरतात, हाडे मजबूत होतात आणि रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. ही सर्व कामे करताना मेंदू वेगवेगळ्या भागांना चालना देतो. त्यामुळे काही वेळा आपले हात पायही झोपेत हलतात.झोपेत मेंदू काम करतो का? होय, मेंदू झोपेत एक क्षणही थांबत नाही. फक्त त्याचे कामाचे स्वरूप बदलते. जागे असताना मेंदूचे लक्ष बाहेरच्या जगावर असते. डोळे, कान, नाक यांच्याकडून येणारी माहिती तो हाताळतो. झोपेत तो आतल्या जगाकडे वळतो.झोपेचे दोन मोठे भाग असतात. पहिल्या भागात शरीर अगदी शांत होते. श्वास मंद होतो, हृदयाची गती कमी होते. या वेळी मेंदू शरीराची दुरुस्ती करतो. मुलांची वाढ याच वेळी होते. म्हणून लहान मुलांना जास्त झोप लागते. दुसऱ्या भागात मेंदू खूप वेगाने काम करतो. डोळे पटापटा हलतात. याच वेळी आपल्याला स्वप्न पडतात. हा भाग खूप महत्त्वाचा आहे.

कारण यात आपण जे नवीन शिकलो ते पक्के होते. सायकल चालवणे, गाणे म्हणणे, गणितातील पाढे हे सर्व याच वेळी मेंदू लक्षात ठेवतो.जर आपण नीट झोपलो नाही तर दुसऱ्या दिवशी राग येतो, अभ्यासात लक्ष लागत नाही आणि लवकर थकवा येतो. म्हणूनच मोठ्यांपेक्षा लहान मुलांना जास्त झोप आवश्यक असते.थोडक्यात सांगायचे तर स्वप्न हा वेळ घालवण्याचा खेळ नाही. ती मेंदूची एक अतिशय हुशार युक्ती आहे. स्वप्नांमधून मेंदू आपल्याला शिकवतो, घाबरवतो, हसवतो आणि तयार करतो. आणि झोपेत असतानाही मेंदू आपल्यासाठी अहोरात्र काम करत असतो. म्हणून रोज वेळेवर झोपा, गाढ झोपा, सुंदर स्वप्न बघा आणि सकाळी नवीन जोमाने उठा. कारण चांगली झोप म्हणजेच चांगले उद्याची गुरुकिल्ली आहे.

### जादूची काठी


एका गावात राम आणि शाम नावाचे दोन मित्र राहत होते. दोघेही एकाच शाळेत शिकत होते. राम रोज सकाळी लवकर उठून अंगणात व्यायाम करायचा. दोरी उड्या, सूर्यनमस्कार आणि थोडे धावणे हे त्याचे नित्याचे काम होते. त्याचे शरीर सुदृढ आणि चेहरा नेहमी टवटवीत दिसायचा. शामला मात्र झोप खूप आवडायची. उठून काय करायचे, संध्याकाळी खेळू तेवढाच व्यायाम होतो ना असे तो म्हणायचा. त्याला आळस आणि चॉकलेट खूप आवडायचे. हळूहळू शाम थकायला लागला. शाळेच्या मैदानावर दोन फेऱ्या मारल्यावर त्याला धाप लागायची. अभ्यास करताना लवकर कंटाळा यायचा.

एके दिवशी शाळेत क्रीडा स्पर्धा होती. २०० मीटर धावण्याची शर्यत होती. राम आणि शाम दोघांनीही नाव दिले. शर्यत सुरू झाली. राम एका तालात धावत होता. शाम पहिल्या ५० मीटरमध्येच थांबला. त्याला पायात गोळे आले आणि तो बसला. शर्यत संपल्यावर शाम उदास बसला होता. तेव्हा राम त्याच्याजवळ आला आणि म्हणाला मित्रा, माझ्याकडे एक जादूची काठी आहे. ती रोज वापरली की शरीरात ताकद येते. शाम म्हणाला कोणती जादूची काठी? मला दे ती. राम हसला आणि म्हणाला ती काठी म्हणजे रोजचा व्यायाम. रोज सकाळी १५ मिनिटे फक्त शरीराला हालव. उड्या मार, ताणून बस, मोकळ्या हवेत श्वास घे. १५ दिवसातच तुला फरक जाणवेल.शामने दुसऱ्या दिवसापासून रामाचे ऐकले. तोही सकाळी उठू लागला. पहिले ३ दिवस कठीण गेले. पण चौथ्या दिवशी त्याला अंग हलके वाटू लागले.

एका महिन्यात तोही मैदानावर रामाबरोबर धावू लागला. पुढच्या महिन्यात पुन्हा स्पर्धा झाली. यावेळी शाम शेवटपर्यंत धावला आणि दुसरा आला. सगळ्यांनी त्याच्यासाठी टाळ्या वाजवल्या.

तात्पर्य : जादूची काठी कुठे नसते. आपले निरोगी शरीरच आपली खरी जादूची काठी आहे. आणि ती मिळवण्याचा मार्ग म्हणजे नियमित व्यायाम. आळस बाजूला ठेवून रोज थोडी मेहनत केली तर अशक्य गोष्टही शक्य होते. निरोगी शरीरातच निरोगी मन राहते.

## आत्मशक्ति



### विनाशर्त प्रेम

उन्माद आणि अगतिकता या गुणधम बिरोबरच प्रेम निःस्वार्थी असते. ते कोणत्याही प्रकारचे भेदभाव, पक्षपात आणि विशिष्ट ओढ जाणत नाही. परमेश्वर आम च्यावर कोणत्याही अटी न लादता प्रेम करतो म्हणून आम्ही सुध्दा इतरांवर विनाशर्त प्रेम केले पाहिजे. आमच्या रोजच्या जीवनात अशा निःस्वार्थ प्रेमाची फारच थोडी उदाहरणे मिळतात. ह्या जगातील सर्वो त्कृष्ट प्रेमातसुध्दा कुठे ना कुठे स्वार्थ दडलेला असतो. आईवडीलांच्या ममतेमागे काही तरी आशा असते. मुलांनी आपल्याशी विशिष्ट पध्दतीने वागावे अशी आम्ही आशा बाळगतो. मुलगा कर्तासवरता झाल्यानंतर आईवडिलांच्या म्हातारपणांत त्याने त्यांचा सांभाळ करावा असेच त्यांनी गृहीत धरलेले असते. त्यामुळे हे प्रेम निःस्वार्थी ठरत नाही. प्रेमी जोडप्यांत आणि पतीपत्नीमध्ये अशी आशा बाळगली जाते की, त्यांनी परस्परांना सुखी समाधानी ठेवावे, एकमेकांनी परस्परांच्या गरजा पूर्ण कराव्यात असेच वाटते. जर दोघांपैकी एकजण ह्या उलट वागला तर त्यांच्यात वादविवाद होतो, मारामाऱ्या होतात व नातेसंबंध संपविले जातात. यावरून त्यांच्यात सुध्दा निःस्वार्थ प्रेम नसते हेच सिद्ध होते.

आत्मा व परमात्मा एकरुप असतात. परमात्मा निस्वार्थ प्रेम करतो, अतएव आत्माही निस्वार्थ प्रेम करतो. जर आम्ही आत्म्याशी संपर्क साधून त्याच्या आत्मीय प्रेमाने इतरांकडे पाहिले तर आम्हीही इतरांवर निस्वार्थ प्रेम करू व परमेश्वराच्या आपल्यावर असलेल्या निःस्वार्थ प्रेमाचा अनुभव घेऊ शकू ! कुणा एकाच फुलावर प्रकाश टाकण्याची चुक करून सूर्य भेदभाव करीत नाही. तो सारखाच प्रकाश देतो. त्यामुळे गुलाब, इतर सर्व फुलं, कंदमुळे व गवत, झाडे झुडपे सर्वांना सूर्यकिरणे प्राप्त होतात. परमेश्वराचे प्रेम असेच असते. तो आम्हा सर्वांना त्याच्या प्रेमाने प्रकाशित करतो मग आम्ही पुरूष वा स्त्री, हिंदु वा मुसलमान, ख्रिस्ती वा यहूदी, शीख वा सूफी किंवा पारशी अथवा जैन असो.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### कर्माचा हेतू

कर्माच्या मागचा हेतू शुद्ध आणि निःस्वार्थ असायला हवा. दान करताना ते केल्याने आपल्याला ओळख मिळेल असा विचार असू नये.

जेव्हा कर्म निःस्वार्थ असतं तेव्हा ऊर्जा आतून बाहेर प्रवाही होते कारण आपण परताव्याची अपेक्षा ठेवत नाही. काहीतरी देताना ऊर्जा आपल्यातून वाहते आणि सर्वांत आधी ती आपल्याला

बळ देते. आपलं दररोज काहीतरी देण्याच्या उद्देशाने कामाला जाऊ या – ज्ञान, कौशल्यं वाटणं आणि सहकार्य करणं, प्रशंसा करणं आणि जबबदारी सोपवणं.

आपले अनुभव आणि समज यांवर आधारित आपली मतं आपण लोकांपुढे मांडली पाहिजेत. त्यांनी आपली मतं फेटाळली तरीही आपली मतं मांडण्याची भूमिका कायम ठेवली पाहिजे. आपला सल्ला नेहमीच अमलात आणला जाईल अशी अपेक्षा ठेवता कामा नये.

आपण ज्यांना भेटतो त्या माणसांविषयी आणि वापरतो त्या प्रत्येक वस्तूविषयी कृतज्ञतेची भावना ठेवायला हवी.

नात्यांना आरोग्य प्रदान करा

सुरेश ओबेरॉय : मागच्या वेळेस मी काही वाचल्याचा उल्लेख केला होता. ते असं – आपल्याकडे भेटवस्तू विकत घ्यायला पैसे नाहीत म्हणून जर आपल्याला कोणाच्या घरी रिकाम्या हाताने जावं लागणार असेल तर अशा परिस्थितीत आपण आशीर्वादाच्या रूपात सर्वांत मोठी भेट देऊ शकतो. हे तुम्ही सविस्तर स्पष्ट करून सांगाल का?

शिवानीदीदी : आपले विचार आणि स्पंदनं ज्यांनी आपलं ऊर्जाक्षेत्र तयार होतं ते आपल्या बरोबरच त्या घरातही प्रवेश करतात. आपलं ऊर्जाक्षेत्र आपण स्वत:पासून वेगळं करू शकत नाही. सर्वसाधारणपणे आपण परिस्थितीअनुसार आणि व्यक्तीअनुसार आशीर्वाद देणं ग्राह्य धरतो. पण आशीर्वाद देण्याचा दुसरा प्रकार म्हणजे आपले विचार स्वच्छ आणि शुद्ध ठेवणं, सगळ्यांबद्दल चांगला विचार करणं जेणेकरून दिवसभर आपण स्वाभाविकरीत्या आशीर्वाद देत राहू. आशीर्वाद देणं म्हणजे 'ऑल द बेस्ट', 'डू वेल' किंवा 'हॅव अ लाँग लाइफ' अशा ठरावीक शुभेच्छा देणं एवढंच नव्हे तर इतर वेळीही आपल्या इतरांबद्दलच्या विचारांची गुणवत्ता तपासत राहणं. (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, लग्नाआधी तुम्ही मला हिऱ्याची अंगठी देणार होता, ती कुठे आहे?
नवरा : अगं, मी तीच शोधतोय! पण ज्या मुलीने ती अंगठी घातली आहे, ती मुलगी तू नाहीयेस!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'मिशन गगनयान' हे कोणत्या देशाचे अंतराळ मोहिमेचे नाव आहे?
– भारत

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### लसूण

जर कोणी आपल्या बरोबर चांगलं वागत असेल तर आपण त्याचे आभार मानलेच पाहिजेत. प्रत्येक बाबतीत कृतज्ञता व्यक्त केल्याने आपली वृत्ती तशीच होते. नाही तर आपण आपल्याकडे काय नाही आणि काय असायला हवं याचा विचार करत राहतो. असा विचार केल्याने आपली ऊर्जा कमी होते.

७) लसूण, कोथिंबीर, बेदाणे, सैंधव, काळी मिरी, जिरे व अर्धा चमचा मिरची पावडर एकत्र करून चटणी करावी व ती जेवताना खाल्ल्यास अरुची कमी होऊन भूक चांगली लागून घेतलेला आहार पचण्यास मदत होते. लसणाचा कल्क (पेस्ट) एक चमचा, वावडिंगाचे चूर्ण एक चमचा, सैंधव पाव चमचा, आल्याचा रस तीन चमचे घेऊन हे सर्व पदार्थ एकत्र करावेत. हे मिश्रण रोज महिनाभर गरम पाण्याबरोबर घेतल्यास सर्दी, खोकला, दमा हे विकार दूर होतात. लसणाच्या चार-पाच पाकळ्या दुधात घालून शिजवाव्यात. हे दूध मुलांना प्यायला दिल्याने जुनाट खोकला बरा होतो.

१०) त्वचेच्या विकारांमध्ये अंगावर खूप खाज येत असेल, तर लसूण वाटून त्याचा कल्क तीळतेलामध्ये शिजवावा. हे सिद्ध झालेले तेल त्वचेवर चोळावे. यामुळे त्वचेची खाज कमी होऊन त्वचाविकार आटोक्यात येतात.

११) लहान बालकांनी तसेच बौद्धिक काम असणाऱ्या व्यक्तींनी, बुद्धी व स्मृतीवाढीसाठी आहारामध्ये लसणाचा वापर नियमित करावा.


१२) लसूण केसांच्या आरोग्यासाठी उत्तम औषध आहे. डोक्यातील कोंडा दूर करण्यासाठी लसणाच्या तेलाने डोक्याच्या त्वचेला मालीश करावे व त्यानंतर डोके स्वच्छ धुवावे. याने केसातील कोंडा दूर होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची
## संत शेख मोहम्मद

वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे सौंदर्य हे आहे की, या संप्रदायाने कधीही जाती, धर्म, पंथ किंवा लिंगाचा भेद केला नाही. विठ्ठलाच्या दारात जो आला, तो केवळ 'भक्त' झाला. या पवित्र परंपरेत चोखामेळा, रोहिदास, कबीर यांच्याप्रमाणेच एका मुस्लिम कुटुंबात जन्म घेऊनही आपल्या अंतःकरणात पंढरीच्या पांडुरंगाला आणि विठ्ठल नामामध्ये तल्लीन असलेले 'एक महान संत होऊन गेले, ते म्हणजे 'संत शेख महंमद'!



आपल्या नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा ही या महान संताची कर्मभूमी. संत तुकाराम महाराजांचे समकालीन असणाऱ्या संत शेख महंमद यांनी आपल्या अथांग वाङ्मयातून आणि चमत्कारांतून सिद्ध केले की, अल्ला आणि विठ्ठल हे एकाच परब्रह्माची दोन नावे आहेत. आपण या थोर समन्वयवादी संताच्या अद्भुत जीवनप्रवासाचे आणि त्यांच्या जीवनातील चमत्कारांचे दर्शन होणार आहे.

संत शेख महंमद यांचा जन्म इसवी सन १५६० च्या सुमारास धारूर (जिल्हा बीड) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राजे महंमद (राजे महंमद गोसावी) असे होते. त्यांचे कुटुंब सूफी संप्रदायाचे अनुयायी होते. सूफी संप्रदायात ईश्वराला प्रेमाच्या माध्यमातून मिळवण्याची परंपरा आहे, ज्यामुळे बालपणापासूनच शेख महंमद यांच्यावर धार्मिक सहिष्णुतेचे संस्कार झाले.

काही काळाने शेख महंमद धारूर सोडून श्रीगोंदा येथे स्थायिक झाले. तिथे त्यांची भेट त्या काळातील महान संत 'चांदबोधले' (संत जनार्दन स्वामींचे गुरु बंधू) यांच्याशी झाली. चांदबोधले यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शेख महंमद यांच्यावर प्रचंड प्रभाव पडला. त्यांनी चांदबोधले यांना आपले सद्गुरू मानले आणि त्यांच्याकडून अनुग्रह (दीक्षा) घेतला. मुस्लिम असूनही त्यांनी हिंदू गुरुपरंपरेचा स्वीकार केला आणि तिथूनच त्यांच्या विठ्ठल भक्तीचा मार्ग सुकर झाला.

संत शेख महंमद हे खऱ्या अर्थाने विचारवंत आणि क्रांतीकारी संत होते. त्यांनी कुराण आणि उपनिषदे या दोन्हीचा सखोल अभ्यास केला होता. त्यांचा असा ठाम विश्वास होता की, बाह्य आचरण, वेशभूषा किंवा भाषा वेगळी असली, तरी प्रत्येकाच्या शरीरात वाहणारा प्राण आणि आत्मा एकच आहे.

त्यांच्या भक्तीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही आपला मूळ इस्लाम धर्म सोडला नाही आणि विठ्ठलाची भक्तीही सोडली नाही. ते नमाजही पठण करत आणि विठ्ठलाच्या नामस्मरणातही दंग होत.

अविंध (मुस्लिम) कुळात जन्म घेऊनही ज्याच्या हृदयात साक्षात गोविंद (विठ्ठल) वास करतो, ते म्हणजे शेख महंमद!

संत शेख महंमद यांच्या भक्तीची परीक्षा घेण्यासाठी आणि त्यांच्यातील दैवी शक्तीची प्रचिती येण्यासाठी त्यांच्या आयुष्यात अनेक प्रसंग घडले, ज्यांचे वर्णन वारकरी साहित्यात आढळते:

एकदा शेख महंमद पंढरपूरच्या वारीला गेले होते. परंतु, तत्कालीन सामाजिक रूढी आणि जातीव्यवस्थेमुळे त्यांना मुस्लिम असल्या कारणाने मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश नाकारण्यात आला. ते महाद्वारात (मंदिराच्या बाहेर) उभे राहून रडू लागले आणि विठ्ठलाची आळवणी करू लागले.

असे म्हणतात की, शेख महंमद बाहेर उभे राहून ज्या क्षणी आर्ततेने ओरडले, त्याच क्षणी मंदिराच्या दगडी भिंती आणि गाभाऱ्याचे दरवाजे जणू पारदर्शक झाले! शेख महंमद यांना बाहेरूनच थेट विठ्ठलाची मूर्ती स्पष्ट दिसू लागली आणि साक्षात पांडुरंगाने त्यांना दर्शन दिले. हा चमत्कार पाहून मंदिरातील पुजारी आणि इतर भाविक थक्क झाले.

एकदा शेख महंमद श्रीगोंद्यात आपल्या मठात बसून अचानक हवेत हात वर करून काहीतरी सावरण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांचे हात गोळा झाले होते आणि ते घामघूम झाले होते. शिष्यांनी विचारले, महाराज, तुम्ही हे काय करत आहात?

शेख महंमद भानावर आले आणि म्हणाले, पंढरपूरमध्ये आषाढी वारीचा उत्सव सुरू आहे. तिथे पांडुरंगाच्या रथावरील छत्र वाऱ्यामुळे एका बाजूला झुकले होते आणि देवाला ऊन लागत होते, मी ते छत्र सरळ करत होतो. शिष्यांनी नंतर पंढरपूरहून आलेल्या वारकऱ्यांकडे चौकशी केली असता, त्याच दिवशी आणि त्याच वेळी पंढरपुरात रथाचे छत्र एका बाजूला झुकले होते आणि ते एका अदृश्य शक्तीने सावरले होते, हे सिद्ध झाले. हा मैलोदूरचा चमत्कार त्यांच्या अथांग भक्तीची साक्ष देणारा ठरला.

शेख महंमद यांच्या विठ्ठल भक्तीमुळे काही कट्टर मुस्लिम मौलवी त्यांच्यावर नाराज होते. एकदा त्यांनी शेख महंमद यांना भ्रष्ट करण्यासाठी त्यांच्या जेवणाच्या पानात गुपचूप मांस (निषिद्ध अन्न) वाढले. शेख महंमद यांनी जेवणापूर्वी विठ्ठलाचे आणि गुरूंचे स्मरण केले आणि पानावरील कापड हटवले.

असे म्हणतात की, विठ्ठलाच्या कृपेने त्या पानावरील मांसाच्या तुकड्यांचे रूपांतर अत्यंत सुगंधी आणि ताज्या फुलांच्या पाकळ्यांमध्ये झाले! हा चमत्कार पाहून त्यांचा छळ करायला आलेले लोक त्यांच्या चरणी लीन झाले.

संत शेख महंमद हे केवळ भक्त नव्हते, तर ते फार मोठे कवी आणि तत्त्वज्ञ होते. त्यांनी मराठी भाषेत अत्यंत मौल्यवान ग्रंथांची रचना केली आहे. त्यांचा 'योगसंग्राम' हा ग्रंथ मराठी अध्यात्मिक साहित्यातील एक मैलाचा दगड मानला जातो. या ग्रंथात त्यांनी मानवी मन, बुद्धी आणि विकार यांच्यातील लढाईचे अतिशय सुंदर रूपकात्मक वर्णन केले आहे.

याशिवाय त्यांनी 'पवनविजय', 'निष्कळंक प्रबोध' आणि शेकडो अभंगांची रचना केली आहे. त्यांच्या अभंगातील एक अतिशय प्रसिद्ध ओवी आजही महाराष्ट्रात समाजप्रबोधनासाठी वापरली जाते:

केळी विघडली तरी कपाशी न विघडे।  
एकची मळवट दोही कडे।।  
शेख महंमद म्हणे अंतरीचा भाव।  
तेथेची वसे माझा पंढरीचा देव।।

संत शेख महंमद यांनी वारकरी संप्रदायाची वारीची परंपरा मनोभावे चालवली. आजही आषाढी वारीला श्रीगोंदा ते पंढरपूर अशी 'संत शेख महंमद महाराज' यांची पालखी आणि दिंडी मोठ्या थाटामाटात निघते. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे यात हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्माचे भाविक एकत्र येऊन टाळ-मृदंगाच्या गजर करत, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल आणि सूफी विचारांचा जयघोष करत पंढरीची वाट चालतात.

संत शेख महंमद यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील अंधश्रद्धा, कर्मठपणा आणि भेदभाव दूर करण्यासाठी घालवले. त्यांनी इसवी सन १६५० च्या सुमारास श्रीगोंदा येथे सजीव समाधी घेतली.

आज श्रीगोंदा येथे त्यांची भव्य समाधी आहे. विशेष म्हणजे, या समाधी स्थळाला 'दर्गा आणि मंदिर' अशा दोन्ही रूपांत पूजले जाते. तिथे दरवर्षी विजयादशमीला (दसरा) खूप मोठी यात्रा भरते, जिथे हिंदू बांधव मशिदीच्या पद्धतीने संदल चढवतात आणि मुस्लिम बांधव विठ्ठलाची आरती करतात.

आजच्या काळात, जेव्हा जगात धर्माच्या आणि जातीच्या नावावर भिंती उभ्या केल्या जात आहेत, तेव्हा संत शेख महंमद यांचे चरित्र मानवी समाजाला जगण्याचा खरा मार्ग दाखवते:

**सर्वधर्मसमभाव :** धर्म हा माणसांना जोडण्यासाठी असतो, तोडण्यासाठी नाही. शेख महंमद यांनी स्वतःच्या आचरणातून हे दाखवून दिले की, खऱ्या भक्ताला कोणत्याही धर्माचे बंधन नसते.

**अंतःकरणाची शुद्धता :** बाह्य कर्मकांडापेक्षा मनाची शुद्धता आणि समता महत्त्वाची आहे, हाच वारकरी संप्रदायाचा खरा गाभा त्यांनी जगाला पटवून दिला.

**साहित्यातून प्रबोधन :** त्यांच्या 'योगसंग्राम' ग्रंथातील विचार आजच्या तरुण पिढीला मानसिक तणाव आणि आंतरिक विकारांवर विजय मिळवण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

जेव्हा भक्तीमध्ये कोणतीही स्वार्थी भावना नसते आणि केवळ विठ्ठल नामाचा 'निजध्यास' असतो, तेव्हा माणसाची जात किंवा धर्म उरत नाही; उरतो तो केवळ अथांग प्रकाश, हेच संत शेख महंमद यांच्या दिव्य चरित्राचे सार आहे.

संत शिरोमणी शेख महंमद माऊली की जय! पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम!



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## आहे घडी ही अपुली माना

"मुसाफिर" वाचनीय मननीय
संकलन: दिशान फिचर्स




माणसे भूतकाळात हरवतात. भविष्यात रंगून जातात. पण वर्तमानाला विसरतात. भूतकाळ उकरून काढता येत नाही. भविष्य हाती लागेल, याचा भरवसा नाही. तरी अनेक वर्तमानाची पर्वा करीत नाहीत ?

काल पोटभर जेवली. उद्या मेजवानीवर ताव मारणार आहे. म्हणून का आजची भूक लागणार आहे? आज लागलीय भूक, तेव्हा आताच हवी पोळी. कालचे जगून संपले, तेव्हा जगणार आहे ?

गते शोको न कर्तव्य भविष्यं नैव चिन्तयेत । वर्तमानेन कालेन वर्तन्ते ही विचक्षणा ।।

कशाला शोक करायचा कालच्या यातनांबद्दल ? उद्या काय ठाऊक कुणाला कशी घडेल अद्दल?

कालचे महत्त्व संपले. उद्याचे कुणी पाहिले? आजचे आहे हाती लागले. तेवढे जगा आपले. आजची चिंता करा. मन कालच्यात रेंगाळले. उद्यामध्ये घुटमळले, तर आज दुर्बल मानले. त्याला आजच्या समस्यांशी झुंजू द्या. संपूर्ण ताकदीनिशी ते उभे होईल उद्या ।

मुक्ताबाई म्हणतात. अनुभवुनी काल। आज ज्याचे त्याने पहावे। जुनीयाला नवे म्हणू नये ।।

भूतकाळाचा अनुभव जमेला धरावा. मग आज कसे वागावे, त्याचा आराखडा लढावा. कालचेच आज घडेल, असे समजाल, तर सगळेच अडेल. तुमचे कार्य नडेल. काळ सारखा बदलत असतो.

माणसे मनोरथ रचतात. इतिहासाच्या स्तुतिसुमनांची उधळण करतात. असाच रम्य भूतकाळ उद्याला नशिबी ठेवलाय म्हणून आश्वसून राहतात. पण त्यात वर्तमानाला विसरतात. वर्तमान बिचारा सापडतो कचाट्यात. अरे माणसा, फक्त वर्तमानकाळात वावर. वर्तमानकाळ सुखासमाधानाचा होईल, याचाच विचार कर.

एक होता कोल्हा तो शेतात गेला खायला. कोवळी पिके खाल्ली. राखणदाराने पाहिली. सोटा घेउन निघाला मारायला कोल्ह्याला. घाबरलेला कोल्हा जीव घेऊन पळू लागला. पळता पळता ऐन निळीच्या भांडणात पडला. निळा निळा झाला. रखवालदार जवळ आला. कोल्हा मेल्याचं ढोंग करून पडला. राखणदार कोल्ह्याला सोडून निघून गेला. कसे फसवले. राखणदाराला, फस्त केले हिरवेगार अंकुर त्या शेतातले. कोल्हा इतिहासात रंगला. कसे त्याचे वेगळेच निळे रूप पाहून वाघ, लांडगे घाबरले. हा कोण नवा प्राणी? उद्या तुम्ही व्हा आमचे राजे. ते वाघ, लांडगे त्याला म्हणाले. मग कोल्हा उद्याच्या स्वप्नरंजनात एवढा रंगला भविष्यात. विसरला आजचा वर्तमानकाळ ?

आज त्याचे भाऊबंद कोल्हे त्याच्याभोवती गोळा झाले. पण त्या निळ्या कोल्ह्याने उद्याच्या स्वप्नात रंगल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्याचे बांधव कोल्हे चिडले. एका अनुभवी म्हाताऱ्या कोल्ह्याने इतरांना कानात काही सांगितले. मग बाकीचे कोल्हे ओरडू लागले. या निळ्या कोल्ह्याला आजचे भान नाही राहिले. उद्याच्या राज्याभिषेकातच त्याचे मन लागले आणि सवयीनुसार तोही इतर कोल्ह्यांप्रमाणेच कुई कुई करीत ओरडू लागला.

वाघ, लांडग्याना तो निळा प्राणी कोल्हाच आहे, हे कळायला कुठे वेळ लागला? अरे, दमाशा, असे म्हणून वाघाने त्या निळ्या कोल्ह्याला तत्काळ ठार केले.

– किशोर गांधी

# पुणे येथील 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया'च्या विशेष अधिकारीपदी अवधूत दुर्गे यांची निवड

नगर – येथील अवधूत दुर्गे यांची सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा पुणे येथे Specialist Officer या पदावर निवड झालेली असून, त्यांचे शिक्षण ENT Engineer, M..B.A. झालेले आहे,

ते सेवानिवृत्त नायब तहसीलदार चंद्रकांत दुर्गे व अर्चना दुर्गे यांचा मुलगा आहेत. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



अवधूत दुर्गे यांची सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा पुणे येथे Specialist Officer या पदावर निवड झाल्याबद्दल बँकेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.




विश्व युवा कौशल्य दिनानिमित्त के. जी. कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स येथे विद्यार्थ्यांमध्ये 'कौशल्य प्रतिज्ञा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत तसेच प्रा.डॉ. स्वाती मुनोत आदी.

# के. जी. कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स येथे 'कौशल्य प्रतिज्ञा' कार्यक्रम उत्साहात

नगर – विश्व युवा कौशल्य दिनानिमित्त के. जी. कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स येथे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, रोजगारक्षमता आणि आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने 'कौशल्य प्रतिज्ञा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य, डिजिटल कौशल्य, नेतृत्व, उद्योजकता आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचे महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आयुष्यभर सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याची, प्रामाणिकपणे कार्य करण्याची आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपल्या कौशल्यांचा उपयोग करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

'एक विद्यार्थी एक कौशल्य' हा संकल्प स्वीकारत प्रत्येक विद्यार्थ्याने आगामी तीन महिन्यांत किमान एक नवीन कौशल्य विकसित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत तसेच महाविद्यालयाच्या कॅम्पस संचालक प्रा. डॉ. स्वाती मुनोत प्रमुख उपस्थित होते. तसेच डॉ. वर्षा किर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकर, संतोष मुनोत, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चाकवते, प्रा. रोहिणी क्षीरसागर आणि सौ. हर्षाली रासकर यांची उपस्थिती लाभली.

महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण, स्वयंरोजगार आणि रोजगाराभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# शिक्षण संपत्ती आणि वाढत्या अपेक्षा विवाहातील सर्वात मोठे अडथळे

## युनुस तांबटकर यांचे प्रतिपादन; रहेमत सुलतान फाउंडेशनच्या मुस्लिम वधू वर मेळाव्यास प्रतिसाद

नगर – समाजात शिक्षणाचा प्रसार, आर्थिक प्रगती आणि आधुनिक विचारसरणी वाढत असताना विवाह जुळविण्याची प्रक्रिया मात्र दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीची होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकेकाळी स्वभाव, संस्कार आणि कुटुंबातील मूल्यांना महत्त्व दिले जात होते; मात्र आज शिक्षण, नोकरी, पगार, संपत्ती आणि सामाजिक प्रतिष्ठा हेच विवाहाचे प्रमुख निकष बनले आहेत, असे प्रतिपादन रहेमत सुलतान फाऊंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर यांनी केले.



रहेमत सुलतान मॅरेज ब्युरोच्या वतीने मुस्लिम वधु वर मेळाव्याचे राज्यस्तरीय आयोजनप्रसंगी उपस्थित लोक.

रहेमत सुलतान मॅरेज ब्युरोच्या वतीने मुस्लिम वधु वर मेळाव्याचे राज्यस्तरीय आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, राजाभैय्या, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, एडवोकेट हनीफ बाबूजी, जफर खान, गुल्लुमामु, सदाकत सय्यद, आसिफ दुलेखान, अभिजीत वाघ, जावेद मास्टर, अबरार शेख, फिरोज शेख आदी उपस्थित होते.

यावेळी लोकांनी वधूवरांचे बायोडाटा एकमेकांना आदान प्रदान केले व मॅरेज ब्युरो मध्ये जमा केले. काही लोकांनी जागेवरच मुला-मुलींना बघण्याचा कार्यक्रम उरकून घेतला. या वधू वर मेळाव्यास शेकडो पालकांनी हजेरी लावली. व उपक्रमा बद्दल समाधान व्यक्त केले.

पुढे बोलतांना तांबटकर म्हणाले की, सध्या अनेक पालक आपल्या मुलासाठी किंवा मुलीसाठी जोडीदार शोधताना प्रथम शिक्षण, नोकरी आणि आर्थिक स्थितीचा विचार करतात. मुलगा चांगल्या नोकरीत असावा, त्याचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम असावे, स्वतःचे घर, व्यवसाय किंवा भरपूर मालमत्ता असावी, अशी अपेक्षा केली जाते. दुसरीकडे, अनेक ठिकाणी मुलगा स्थिर नोकरीत नसला तरी त्याला मात्र उच्चशिक्षित आणि नोकरी करणारी मुलगी हवी असते. काही कुटुंबे एकुलती एक मुलगी किंवा भरपूर संपत्ती असलेल्या कुटुंबातील मुलीला प्राधान्य देतात.

यामुळे अनेक वेळा योग्य शिक्षण असलेला मुलगा मिळत नाही, तर कधी उच्चशिक्षित मुलीला तिच्या अपेक्षेनुसार मुलगा मिळत नाही. दोघेही उच्चशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असले तरी एकमेकांकडून असलेल्या अवास्तव अपेक्षांमुळे विवाह जुळणे कठीण होते. अपेक्षित जोडीदाराच्या शोधात वर्षानुवर्षे वेळ निघून जातो आणि लग्नाचे वय वाढते.

वय वाढल्यानंतर अनेकांना परिस्थितीशी तडजोड करून विवाह करावा लागतो. मात्र परस्पर समज, संवाद आणि विश्वास याऐवजी केवळ तडजोडीवर उभे राहिलेले नाते अनेकदा टिकवणे कठीण जाते. परिणामी, वैवाहिक जीवनात मतभेद वाढण्याची आणि नाते तुटण्याची शक्यता निर्माण होते.

मनोगत व्यक्त करताना जिवन फाऊंडेशनचे अध्यक्ष सय्यद आरिफ म्हणाले की, समाजातील जाणकारांचे मत आहे की, शिक्षण आणि आर्थिक स्थैर्य महत्त्वाचे असले तरी त्यापेक्षा स्वभाव, परस्पर आदर, संस्कार, समंजसपणा, जबाबदारीची जाणीव आणि एकमेकांना समजून घेण्याची तयारी या गुणांना अधिक महत्त्व दिले गेले पाहिजे. विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांचा आणि दोन विचारांचा मिलाफ असतो. त्यामुळे अवास्तव अपेक्षा कमी करून वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारल्यास अनेक तरुण-तरुणींचे विवाह वेळेत होण्यास मदत होईल आणि वैवाहिक जीवनही अधिक आनंदी व यशस्वी होऊ शकेल असे नमुद केले.

यावेळी मुला मुलींच्या आलेल्या पालकांनी असे वधू वर मेळावे लवकर लवकर घेण्यात यावे जेणेकरून लवकरात लवकर मुलांचे लग्न जोडविण्यात यश मिळेल असे नमूद केले.

शफकत सय्यद यांनी आभार मानले.

# श्रुती संगीत निकेतन प्रस्तुत 'संगीत ऊस डोंगा परी'ला पुणेकर रसिकांचा उदंड प्रतिसाद

नगर – अहिल्यानगरच्या श्रुती संगीत निकेतन प्रस्तुत केलेला पं. डॉ.विकास कशाळकर लिखित संगीत ऊस डोंगा परी या नाटकाचा प्रयोग पुणे येथील भरत नाट्य मंदिर येथे १० जुलै रोजी रसिकांच्या उदंड आणि हाऊसफुल्ल प्रतिसादामध्ये झाला. अहिल्यानगरच्या टीमने सादर केलेल्या कलाकृतीला विद्या आणि कलेचे माहेरघर असलेल्या पुण्यनगरीतील जाणकार रसिकांनी वन्स मोर आणि टाळ्यांच्या गजरात हाऊसफुल प्रतिसाद दिला.

संगीतज्ञ पंडित विकास कशाळकर यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने संत चोखामेळा यांच्या जीवनसंघर्षावर आधारित त्यांनीच लिहिलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या दोन अंकी नाटकाचा प्रयोग श्रुती संगीत निकेतन यांच्या ५० पेक्षा अधिक कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या टीमने दिग्दर्शिका डॉक्टर धनश्री खरवंडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली साकारला.

संत चोखामेळा यांच्या जीवनावरील हे नाटक सादर झाले त्या दिवशी माऊली आणि तुकोबांच्या पालखीचा पुणे मुक्काम आणि त्याचबरोबर एकादशी असा त्रिवेणी संगम घडून आला आणि संपूर्ण सभागृह विठू नामाच्या गजरामध्ये तल्लीन झाले.

यामध्ये प्रमुख भूमिका शौनक कुलकर्णी, डॉक्टर हृषिकेश कुलकर्णी, संकेत शाह, अनिकेत देऊळगावकर, संगीता देऊळगावकर, मोहित मेहेर, विशाल काशीद, श्रावण शिंदे, अनुजा कुलकर्णी आणि चोखोबांची भूमिका ओंकार देऊळगावकर यांनी साकारल्या. या कलाकारांना समर्थ साथ ऑर्गनवर प्रा. मकरंद खरवंडीकर, पखवाज वर शेखर दरवडे, तबल्यावर सुपर्ण प्रताप, टाळ किरण जोशी आणि चिपळ्या शार्दुल खोल्लम यांनी दिली. टाळ मृदुंगांच्या आणि विठू नामाच्या गजरामध्ये संपूर्ण सभागृह तल्लीन झाले.

त्याकाळचे चित्रण हुबेहूब उभे करण्यासाठी वेशभूषा संतोष आणि मोहिनी खोल्लम परिवार, रंगभूषा चंद्रकांत सैंदाणे, केशभूषा सविता भैरी, प्रकाशयोजना गणेश लिमकर, नेपथ्य नाना मोरे त्यांनी विशेष परिश्रम घेतले.





अहिल्यानगरच्या श्रुती संगीत निकेतन प्रस्तुत केलेला पं. डॉ.विकास कशाळकर लिखित संगीत ऊस डोंगा परी या नाटकाचा प्रयोग पुणे येथील भरत नाट्य मंदिर येथे १० जुलै रोजी रसिकांच्या उदंड आणि हाऊसफुल्ल प्रतिसादामध्ये झाला.

हा भक्तीमय प्रयोग पाहण्याकरता पुणे येथील संगीत, नाट्य, अभिनय तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होते. यामध्ये पंडित डॉ. विकास कशाळकर, डॉ. राजश्री कशाळकर, पंडित अरुण कशाळकर, प्रमुख अतिथी सनदी लेखापाल विजयकांत कुलकर्णी, पंडित विजय कोपरकर, राहुल सोलापूरकर, खासदार मेधाताई कुलकर्णी, पंडित सुरेश साखवळकर, पांडुरंग मुखडे, अस्मिता चिंचाळकर, विदुषी आशाताई खाडिलकर, ज्येष्ठ गायिका अभिनेत्री मधुवंतीताई दांडेकर आणि निर्मलाताई गोगटे, विदुषी मंजुषा पाटील, ओंकार खाडिलकर, ज्येष्ठ संगीतज्ञ पतंजली मादुसकर, ऑर्गनवादक राजीव परांजपे, संजय गोगटे, रवींद्र कुलकर्णी, रवींद्र क्षीरसागर, धनंजय आणि कविता खरवंडीकर आदी उपस्थित होते.

नाटकातील अनेक भक्ती पदांना आणि अभंगाना रसिकांची मोठी दाद आणि पुणेकरांकडून वन्समोअरचा प्रतिसाद मिळाला. यामध्ये 'न कळे ज्ञान, जयासी लागली रामनामी गोडी, बैसोनी एकांती, जन्मला देह, विठोबा पाहुणा, अवघा रंग, ऊस डोंगा परी आदी रचनांना टाळ्यांचा कडकडाट होत होता. संत चोखामेळा, सोयराबाई, संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे परस्पर स्नेहबंध आणि भेटींचे प्रसंग विशेष खुलले. प्रेक्षकांमधून आलेली आणि नामदेव, ज्ञानेश्वर, चोखोबा यांची छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सहभागी वारकऱ्यांची दिंडी, नाटकाच्या शेवटी भिंत कोसळण्याची घटना आदी प्रसंगांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

डॉक्टर धनश्री खरवंडीकर यांची दिग्दर्शक म्हणून संपूर्ण नाटकावरील पकड दिसून आली त्यामुळे प्रत्येक प्रसंग बारकाव्यानीशी खुलला. नृत्यदिग्दर्शन कल्याणी कामतकर यांनी केले. त्यांच्या विद्यार्थिनींनी धिक् तो आचार या गीतावर सादर केलेले नृत्य परिणामकारक झाले.

# ऊसतोडणी मजुरांच्या गुलामी आणि शोषणाविरोधात २४ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

## मुकादम, कंत्राटदार व साखर कारखाना व्यवस्थेतील शोषणातून ऊसतोडणी मजुरांची मुक्तता करा : ॲड. कारभारी गवळी

नगर – ऊसतोडणी मजुरांवरील आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक शोषणाविरोधात संघटित जनलढा उभारण्याचा निर्धार पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'ऊसतोडणी मजूर गुलामी व शोषणविरोधी आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी दिली.

ऊसतोडणी मजूर हे बहुतांश गरीब, अशिक्षित, स्थलांतरित आणि असंघटित कुटुंबांतील असतात. मुकादम, ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार आणि काही साखर कारखान्यांच्या व्यवस्थेमुळे अनेक मजूर कर्ज, आगाऊ रक्कम आणि एकतर्फी करारांच्या जाळ्यात अडकतात. ऊसतोडणीचा हंगाम सुरू झाल्यानंतर त्यांच्याकडून अत्यंत कष्टाचे काम करून घेतले जाते. मात्र योग्य मजुरी, सुरक्षित निवास, आरोग्यसेवा, अपघात विमा, महिलांची सुरक्षितता, मुलांचे शिक्षण आणि कायदेशीर संरक्षण यांकडे गंभीर दुर्लक्ष केले जाते.

काही भागांत मजुरांना धमकावणे, त्यांच्या हालचालींच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणे, कुटुंबीयांना भीती दाखवणे किंवा बळजबरीने काम करून घेणे, अशा घटना व आरोप समोर येत आहेत. काही प्रकरणांत मजुरांना जबरदस्तीने दुसऱ्या ठिकाणी नेल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या आहेत. अशा प्रत्येक तक्रारीची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता, बंधमजुरी पद्धती (निर्मूलन) अधिनियम, बालमजुरीविरोधी कायदे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ॲड. गवळी यांनी केली.



भारतीय संविधानातील अनुच्छेद २३ मानव तस्करी, वेठबिगारी आणि अन्य प्रकारच्या जबरदस्तीच्या मजुरीस प्रतिबंध करतो. तसेच बंधमजुरी पद्धती (निर्मूलन) अधिनियम, १९७६ नुसार बंधमजुरीची पद्धत बेकायदेशीर ठरविण्यात आली आहे. त्यामुळे आगाऊ रक्कम, कर्ज किंवा कराराच्या नावाखाली कोणत्याही मजुराच्या स्वातंत्र्यावर बंधने घालता येणार नाहीत, असे संघटनेने स्पष्ट केले आहे.

अलीकडील काळात महाराष्ट्रातील ऊसतोडणी क्षेत्राशी संबंधित जबरदस्तीच्या मजुरीचे प्रश्नही समोर आले आहेत. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात २०२५ मध्ये २७ कथित बंधमजुरांची सुटका झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातील आदिवासी मजुरांना महाराष्ट्रात ऊसतोडणीच्या कामासाठी फसवून आणल्याच्या तक्रारींनंतर त्यांची सुटका करण्यात आल्याचेही वृत्त समोर आले होते. संबंधित यंत्रणांनी या घटनांची सखोल चौकशी करून अशा प्रकारांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी कायम स्वरूपी प्रतिबंधात्मक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी संघटनांनी केली आहे.

ॲड. कारभारी गवळी म्हणाले, ऊसतोडणी मजूर हे साखर उद्योगाचा खरा कणा आहेत. मात्र त्यांनाच कर्जाच्या जाळ्यात, अपमानात, असुरक्षिततेत आणि भीतीच्या वातावरणात ठेवले जात असेल, तर अशा व्यवस्थेचे पुनर्मूल्यांकन करावे लागेल. साखर कारखान्यांत तयार होणाऱ्या गोड साखरेमागे मजुरांच्या अश्रूंची कडू कहाणी लपून राहता कामा नये.

या आंदोलनाच्या माध्यमातून प्रत्येक ऊसतोडणी मजुराला अधिकृत ओळखपत्र, लेखी करार, निश्चित मजुरी, बँक खात्यामार्फत वेतन, विमा संरक्षण, अपघात भरपाई, आरोग्यसेवा, महिलांसाठी स्वतंत्र संरक्षणव्यवस्था, मुलांसाठी शिक्षण, सुरक्षित निवास आणि मोफत कायदेशीर मदत मिळावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असल्याची शासकीय माहिती उपलब्ध आहे. मात्र या योजनांचा लाभ प्रत्यक्ष ऊसतोडणी मजूर आणि त्यांच्या कुटुंबांपर्यंत पारदर्शकपणे आणि प्रभावीरीत्या पोहोचत आहे की नाही, याचे सामाजिक लेखापरीक्षण झाले पाहिजे, अशी भूमिकाही संघटनांनी मांडली आहे.

राज्यातील प्रत्येक ऊसतोडणी मजूर आणि त्याच्या कुटुंबाची शासनाकडे अनिवार्य नोंदणी करण्यात यावी. मुकादम, कंत्राटदार आणि साखर कारखाने यांच्यातील मजुरी, आगाऊ रक्कम, वाहतूक आणि कपातीचे सर्व व्यवहार पारदर्शक करण्यात यावेत. प्रत्येक मजुराला त्याच्या समजण्याजोग्या भाषेत लेखी करार देणे, मजुरी थेट बँक खात्यात जमा करणे आणि प्रत्येक व्यवहाराची अधिकृत पावती देणे बंधनकारक करण्यात यावे.

तसेच बंधमजुरी, धमकी, जबरदस्ती, मजुरांना बेकायदेशीररीत्या रोखून ठेवणे, कुटुंबीयांना ओलीस ठेवणे किंवा त्यांच्या हालचालींचे स्वातंत्र्य हिरावून घेणे, अशा प्रत्येक तक्रारीवर तातडीने चौकशी करून आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, यांसह एकूण १२ प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात ऊसतोडणी मजूर, कामगार संघटना, सामाजिक कार्यकर्ते, वकील, मानवाधिकार कार्यकर्ते आणि जागरूक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या आंदोलनासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# तृतीयपंथीयांनी शिष्यवृत्ती, बीज भांडवल योजनेचा लाभ घ्यावा : समाज कल्याण विभागाचे आवाहन

नगर – तृतीयपंथी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केंद्र शासनाच्या स्माईल योजनेंतर्गत शिष्यवृत्ती तसेच तृतीयपंथी व्यक्तींना स्वयंरोजगार व व्यवसायाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनामार्फत बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील इच्छुक तृतीयपंथीयांनी या दोन्ही योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणासाठी केंद्रीय क्षेत्र योजनेंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. शासनमान्य किंवा खासगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये इयत्ता नववी ते पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथी विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष १३ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे. विद्यार्थी भारताचा नागरिक असावा व त्याच्याकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या तृतीयपंथी व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी केलेले तृतीयपंथी ओळख प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीची संख्या मर्यादित असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणांच्या आधारे केली जाईल. केंद्र किंवा राज्य शासन पुरस्कृत अन्य शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळणार नाही. विद्यार्थ्याचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीसाठी तृतीयपंथी व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवर (https://transgender.dosje.gov.in?utmšsource=chatgpt.com) ऑनलाइन अर्ज करता येईल.

तृतीयपंथीयांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास साधण्यासाठी राज्यात बीज भांडवल योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात किमान १० वर्षे वास्तव्य असलेल्या तृतीयपंथी व्यक्तींना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. अप्रशिक्षित तृतीयपंथी व्यक्तींना २१ प्रकारच्या लघु व्यवसायांसाठी, तर प्रशिक्षित व्यक्तींना १२ प्रकारच्या व्यवसायांसाठी तसेच प्रशिक्षण देऊन आवश्यक साधनसंच खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असावे. त्याच्याकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या तृतीयपंथी व्यक्तींसाठीच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी केलेले तृतीयपंथी ओळख प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. योजनेत २५ हजार रुपयांपर्यंत लघु कर्ज, ५० हजार रुपयांपर्यंत मध्यम कर्ज व २ लाख रुपयांपर्यंत दीर्घ कर्ज यापैकी कोणतेही एक कर्ज अनुज्ञेय राहील. लाभार्थ्याचा हिस्सा ५ टक्के असून ४५ टक्के शासकीय अनुदान व ५० टक्के रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल. नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजदरात ३ टक्के सवलत दिली जाईल.

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे व्यवसायाचा परवाना, व्यवसायासाठी लागणारी सामग्री व यंत्रसामग्रीचे कोटेशन, बिले, जागेचा ७/१२ उतारा किंवा जागा भाड्याने असल्यास भाडेकरारनामा, व्यवसायाचा स्थळदर्शक नकाशा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर कार्यालयात सादर करावेत.

या दोन्ही योजनांच्या अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर कार्यालयाच्या ०२४१–२३२९३७८ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री.कोरगंटीवार यांनी केले आहे.

# जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनतर्फे नर्सिंग अ., ऑपरेशन थिएटर असिस्टंट, टेक्निशियन, फिजिओथेरपी क्षेत्रात करीअरची संधी

नगर – येथील जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनव्दारा रोजगार व स्वयंरोजगार संधी देणारे नर्सिंग अ./ऑपरेशन थिएटर असिस्टंट / टेक्निशियन/फिजीओथेरपी क्षेत्रात करीअरची संधी उपलब्ध करून दिली जाते. हि संस्था महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबईशी सलग्न आहे. ही संस्था वैद्यकिय सुविधा शिक्षण, जनजागृतीसाठी उदयास आली आहे. तसेच स्वयंरोजगाराची संधी आणि मानवी राहणीमान उंचाविण्यासाठी क्षमता तयार करण्याचे कार्य संस्थेच्या वतीने चालते.

नगर शहरातील प्रसिध्द जीवन ज्योत मेडीकल फाउंडेशन, बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, वनविभाग कार्यालयामागे, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगर हि संस्था शासनमान्यता असून २७ वर्षांपासून कार्यरत आहे.

दहावी पास व बारावी / पदवीधर पास/नापास मुला–मुलींसाठी नर्सिंग अ. / ऑपरेशन थिएटर असिस्टंट / टेक्निशियन / फिजिओथेरापी क्षेत्रातील कोर्सेस येथे चालविले जातात दोन वर्षांत / एक वर्षांत स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची संधी. शासकिय / खाजगी नोकरीची पात्रता व संधी असलेले नर्सिंग अ. / ऑपरेशन थिएटर असिस्टंट / टेक्निशियन / फिजिओथेरपीचे कोर्सेस येथे उपलब्ध आहेत.

खेडयापाडयातील गरजु व होतकरु विद्यर्थ्यांना या कोर्सेस मध्ये सहभागी होऊन आरोग्य क्षेत्रामध्ये काम करण्याची संधी या विविध कोर्सेसमुळे विदयार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. येथे अत्यल्प दरात विदयार्थ्यांना सदर कोर्सेस मध्ये प्रवेश घेवुन शिक्षण घेता येईल. कोर्स करत असताना प्रात्याक्षिक करीता हॉस्पीटल, ऑपरेशन थिएटर व फिजिओथेरपी विभागात विदयार्थ्यांना शिक्षण घेता येणार आहे.

एक वर्ष कालावधी असलेले नर्सिंग केअर हा कोर्स आहे. हा कोर्स उत्तीर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, मलेरिया व इतर विभागात आरोग्य सेवक पदावर शासकीय नोकरीची संधी आहे. सन २००८ ते २०२६ पर्यंत संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेत व इतर विभागात आरोग्यसेवक भरती प्रक्रिया झाली आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत शासकीय नोकरीची संधी तसेच खाजगी मल्टीस्पेशालिस्ट व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये नोकरीची संधी.

आरोग्य क्षेत्रात नव नवीन शासनाच्या योजना जसे आयुष्यमान भारत, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना यामुळे वाढती हॉस्पीटलची संख्या पहाता नर्सिंग केअर विदर्याथ्यांची गरज मोठया प्रमाणावर भासत आहे.

एक वर्ष कालावधी असलेले ऑपरेशन थिएटर असिस्टंट/टेक्निशियन हा कोर्स उत्तीर्ण झाल्यानंतर विदयार्थी हास्पीटलमध्ये ऑपरेशनसाठी लागणारे साहित्य व इतर सामग्री सर्जनला तयार करून देणे, विदयार्थी तज्ञ डॉक्टरांना व ऑपरेशन थिएटर इनचार्जला असिस्ट करु शकतो. ऑपरेशन थिएटर व्यवस्था व निर्जंतुकीकरण करणे या सर्वांची जबाबदारी घेतो. सर्जनला भुल देणाऱ्या डॉक्टरला असिस्ट करू शकतो. ऑपरेशन थिएटरच्या सामग्री व औषधांची कॉम्प्युटरद्वारे नोंद ठेवणे, ऑपरेशन थिएटरमध्ये लागणाऱ्या वेगवेगळ्या ट्रॉलीज तयार करणे, उपकरणांची देखरेख करणे व हाताळणे, पेशंटची ऑपरेशन थिएटरमध्ये आणण्या आगोदर ऑपरेशन थिएटरमध्ये भुलीच्या परिस्थीतीत व रिकव्हरी रुममध्ये देखरेख करणे, संगणकाचा वापर करून ऑपरेशन थिएटरच्या कामकाजाची नोंद ठेवणे, आदि काम करू शकतो. २०१० ते २०१६ पर्यंत हे कोर्स पुर्ण झालेल्या विदयार्थ्यंना सेंट्रल गव्हर्नमेंटच्या इएसआयसी मॉडेल हॉस्पीटलमध्ये ओटी असि./ टेक पदावर (स्केल ९३००–३४८०० ग्रेड पे ५६०० ) नेमणुक प्रक्रिया झाली आहे. AIMS हॉस्पीटल मुंबई येथे जुन २०१५–२६ पर्यंत ३३७ जागां भरती प्रक्रिया झाली आहे. तसेच खाजगी मल्टीस्पेशालिस्ट व सुपर स्पेशालिटी हास्पीटलमध्ये नोकरीची संधी. आजपण शासकिय ग्रामीण / जिल्हा रुग्णालय, नगर / महानगर पालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र व विविध शासकिय, निमशासकिय, खाजगी, सुपर स्पेशालिटी व मल्टीस्पेशालिटी रुग्णालयामध्ये भरती प्रक्रिया चालु आहे.

दोन वर्ष कालावधी असलेला डिप्लोमा कोर्स इन फिजिओथेरपी हा कोर्स आहे. फिजीओथेरेपिस्टची गरज ही खेळांपासुन ते सामान्य माणसापर्यंत सर्वांना आहे. हा कोर्स पुर्ण केल्यानंतर स्वतःची सामाजिक व आर्थिक स्थिती उंचावेल. वैदयकिय क्षेत्रामध्ये फिजीओथेरेपीला खुप महत्व आहे. यातुन रुग्णांना लवकर आराम मिळतो व त्यांना औषधापासून दुर राहता येते. त्यामूळे रुग्ण या उपचारांना प्रधान्य देतात. हा कोर्स पुर्ण झाल्यावर डॉक्टर व अस्थिरोग तज्ञांना असिस्ट करू शकतो. मॉलिश, मसाज, व्यायाम, वॉटर थेरेपी, व विविध उपकरणांव्दारे पेशंटचे रोग निवारण करण्यास मदत करतो.

अपंगाना उपकरणाव्दारे सहाय्य करू शकतो. सरकारी आणि खाजगी दवाखाने/ हॉस्पीटल, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्यकेंद्र आदी ठिकाणी काम करण्याची संधी मिळते. तसेच हा कोर्स उत्तीर्ण झाल्यावर आश्रम, अंध, अपंग, मुकबधीर मतिमंद व बहुविकलांग, शाळांमध्ये नोकरीची संधी व स्केल (९३००–३४,८०० ग्रेड पे ५६००) प्रमाणे वेतन मिळते.उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी.

तरी अधिक माहितीसाठी बॉम्बे हास्पीटल बिल्डींग, वनविभाग मागे, नगर औरंगाबादरोड, अहमदनगर. मो. ८८३०६८५७३२ येथे त्वरीत संपर्क साधावा.


# पंढरीची जात्यावरची वारी।

*या लेखामधून आमच्या आई दिवंगत कै. श्रीमती अनुसया काळे संग्रहित जात्यावरील ओव्यातून पंढरपूरची साकारलेली वारी...*

साधारणतः १९७० सालापर्यंत आपल्याकडे विजेचा प्रसार हवा तेवढा झाला नव्हता. स्वाभाविकपणे गावोगाव पिठाच्या गिरण्यांचा अभाव होता. चार–दोन गावं मिळून असलीच तर एखादी डिझेल इंजिन वर चालणारी पिठाची गिरणी आढळून येत असे. आज सर्व काही बदलले आहे. नवीन पिढीसाठी याचे मागमुसही मागे उरलेले नाहीत. आज गल्लोगल्ली दळण दळण्यासाठी पिठाच्या गिरण्या आहेत. एवढेच नव्हे तर आपापल्या घरी अनेक जण घरगुती गिरण्या बाळगून आहेत. हल्ली मॉलमध्ये आयते दळलेले पीठही उपलब्ध झाले आहे. पूर्वीचा काळ खूप कठीण होता. दळण दळावयाचे म्हणजे जात्याशिवाय पर्याय नव्हता. घरोघरी कोपऱ्यात जाती रोवलेली असावयाची. जाते म्हणजे एकावर एक बसवलेल्या गोलाकार दगडी तळ्या. त्यावर जात्याला ओढण्यासाठी म्हणून एक लाकडी खुंटा असे. ही जाती घडीव व कुरुंदाच्या दगडाची असत. दळण टाकण्यासाठी मध्यभागी एक गोलाकार तोंड असे. अधूनमधून टकारी ही जाती लावण्यासाठी येत असत. जाते लावणे म्हणजे त्याच्या दोनही तळ्यांवर छनी हातोड्याने सुर्यकिरणांसद्रुष खोल खाचा मारणे ज्या योगे दळण दळले जाते. शेजारी सुपात दळावयाचे धान्य घेतले जाई. दळून तयार झालेले पीठ घमेले किंवा पातेल्यात भरून घेतले जाई. जात्यावर मुख्यत्वे अन्नधान्य म्हणजे गहू, बाजरी, ज्वारी आणि कुळीद दळले जात.

जात्यावर दळण दळताना शक्यतो जोडीने दळले जाई. एकट्या व्यक्तीस जाते ओढणे तेवढं सोपे नसते. समोरासमोर जोडीने बसून गोलाकार फिरणारे जाते ओढणे सुखकर असते. जाते ओढणाऱ्या जोड्या शक्यतो ठरलेल्या असत. मायलेकी, सासु–सुना, जावा–जावा, बहीण–भाऊ, नणंद–भावजय. भाऊ–भाऊ, माय–लेक किंवा अगदीच घरचे कुणी नसल्यास हक्काची शेजारीण. पूर्वी शेजार धर्म पाळला जाई. जात्यावर दळण दळण्याच्या वेळा म्हणजे मुख्यत्वे भली पहाट, संध्याकाळ किंवा रात्रीचा पहिला प्रहर असे. या वेळेत जात्यांची घरघर आणि त्यावर गायल्या जाणाऱ्या ओव्यांचे मंजुळ स्वर घरोघरी कानी पडत. घामाने भिजलेल्या हातातील काचेच्या बांगड्यांची किनकिन आईच्या कष्टाची जाणीव करून देत असत. अशा प्रसंगी कधीकधी जात्यावरील जोडी बदलली जाई. जाते ओढणे कष्टसाध्य व्हावे म्हणून जाते ओढताना मुख्यत्वे ओव्या किंवा काही गाणी गायली जात. पहाटेच्या जात्यावरच्या ओव्या किंवा गाणी म्हणून त्या आजही प्रचलित आहेत. जात्यावर गायलेल्या ओव्यांमधून मुख्यत्वे देवीदेवतास आळविले जाई. यात पंढरीचा पांडुरंग किंवा विठ्ठल, प्रभू रामचंद्र व सीतामाई, हनुमान, श्रीकृष्ण–राधा यांच्यावरील ओव्या अधिक असत. सवाल–जवाबाच्या धरतीवर देखील सासू–सुना व जावा–जावा यांची एकमेकींची उणीदुणी काढणाऱ्या मजेशीर ओव्या कधीकधी ऐकावयास मिळत असत. यात एकमेकींची चेष्टा करण्याचा सूर असे. मात्र हे सर्व काही प्रेम व मांगल्याने भरलेले असे. त्यातल्या त्यात विठ्ठलाच्या ओव्या मनाला खूपच भावणाऱ्या आहेत. वारकऱ्यांसाठी पंढरपूर म्हणजे दुथडी भरून वाहणारी चंद्रभागा, काठावरचे पुंडलिकाचे मंदिर, नामदेवाची पायरी, अठ्ठावीस युगे कटेवर हात ठेवून उभा असलेला कानडा विठ्ठल, वामांगी रखुमाई, चंद्रभागेच्या पात्रात सदैव निम्मे अर्धे बुडलेले नारदांचे मंदिर, विष्णुपद आणि जनीचे गोपाळपूर. सरत्या ज्येष्ठात पंढरपूर वारीची धामधूम सुरू होते. आषाढात पायी दिंड्या पंढरपूरकडे मार्गस्थ होऊ लागतात. या प्रसंगी वारकऱ्यांच्या मनीची हुरहुर व्यक्त करताना जात्यावर ओवी गायली जाई –

विठ्ठल विठ्ठल येड लागलं जीवाला
कधी जाईल मी पांडुरंगाच्या गावाला



सख्या सहेलींच्या मनाची वारीसाठी मानसिक तयारी करताना त्या म्हणतात–

चला गं सयांनो जाऊ
पंढरपुराला
तुळशीच्या माळा वाहू
सारंगधराला

माहेररुपी पंढरीचे वैभव सांगताना ओवी आकार घेई –

पंढरपूर माझे माहेर आनंदाचं
चंद्रभागेमधी देऊळ नारदाचं

माहेरी निघालेली सासुरवाशीन जाताना सोबत काय काय घेणार हे सांगताना म्हणते –

पंढरपुराला सये मी जाते माहेराला
विठ्ठल माझा बाप बुका घेते आहेराला

ही सासुरवाशीन एकट्या बापाची आठवण कशी करील? तिला सर्व गणगोत आठवते आणि मग ती म्हणते–

विठ्ठल माझा पिता, रुक्मिणी माझी आई
पुंडलिक माझा भाऊ, भीमा माझी भाऊजई

माहेरी पोहोचल्यावर दिसणाऱ्या दृश्याचे वर्णन करताना आनंदाने ती म्हणते –

विठ्ठल विठ्ठल हाका मारीते कवाची
भरली चंद्रभागा झाली गर्दी नावाची

चंद्रभागेचा वाढत जाणारा पूर बघून ती चिंताग्रस्त होते आणि काळजी युक्त स्वरात म्हणते –

भरली चंद्रभागा पाणी पिंपळ पायरी
बोलं रुक्मिणी पुंडलिका निघ बाहेरी

विठुरायाच्या रूपाचं वर्णन करताना ती गाते –

पंढरीचा विठू एवढा काय काळा
हातामध्ये विणा गळा तुळशीच्या माळा

युगानुयुगे कर कटेवर ठेवून उभा असलेल्या पांडुरंगाचे वर्णन करताना तिला ओवी सुचते –

पंढरीचा विठू एवढा काय धीट
लहान मोठ्याला उभ्याने गं देतो भेट

पंढरीला जाणारे सर्व भक्त पांडुरंगाचे आणि रुक्मिणीला फुकाचा त्रास हे सांगताना –

विठ्ठला शेजारी काय रुक्मिणी बसना
अबिर बुक्याची गं हिला गर्दी सोसना

असे ती उपहासाने म्हणते.

संत नामदेवाच्या पायरीचा महिमा सांगताना तिला ओवी स्फुरते –

संसारी येऊन एकदा पंढरी करावी
नामदेवाची पायरी मनी हृदयी धरावी

दर्शन बारीला लागल्याच्या प्रसंगाचे वर्णन करताना ती म्हणते –

पंढरपुरीच्या मी तर लागले बारीला
माझ्या गं दर्शनाची चिंता पडली हरीला

दर्शन बारी संपवून आत मंदिरात गाभाऱ्यात पोहोचल्यावर तिच्यासमोर वेगळीच अडचण उभी राहते आणि तेव्हा ती म्हणते –

तुळशीच्या माळा, माळा पैशाच्या विस
पुरणारे हात विठ्ठला खाली बैस

यात्रेत गेल्यावर तिला खरेदीचा मोह अनावर होतो आणि मग ती ओवी गाते –

पंढरपुरात गल्लोगल्लीला कसार
रुक्मिणी विठ्ठलाची देती चुड्याला इसार

हे सर्व घडत असताना जनी विषयीचा तिच्या मनातील दुस्वास जागा होतो आणि मग ती फणकाऱ्याने म्हणते –

विठ्ठलाचे पाय रुक्मिणी दाबी रागंरागं
खरं सांगा देवा जनी तुमची कोण लागं?

तेव्हा रुक्मिणीची समजूत काढताना–

विठ्ठल म्हणं जनी आपलं लेकरू
समयाच्या शिरी आलं वस्तीला पाखरू

जनीच्या विठ्ठलावरील श्रद्धायुक्त भक्तीची तुलना करताना खोडकरपणे ती म्हणते –

सव्वाखंडी फुलं रुक्मिणीची सेज मऊ
जनीच्या वाकळ्यांची विठ्ठलाला प्रित बहू

अशी ही पंढरीची जात्यावर बसल्या जागी वारी करताना तिला दिसतं की, पंढरीची वाट तर काळी झाली आणि मग सरते शेवटी ती म्हणते –

पंढरीची वाट कशानं गं काळी झाली
देवा विठ्ठलानं बुक्कयाची गं गाडी नेली.

(वेळेचा सदुपयोग म्हणून जुन्या दिवसांच्या आठवणी काढत आमची नात नारायणी हिने आईला आठवतील तेवढ्या जात्यावरील ओव्या कागदावर उतरवून घेण्याचा प्रपंच सिद्धीस नेला. त्यातीलच याकाही ओव्यांमध्ये पंढरपूरच्या वारकऱ्यांची पांडुरंगाच्या ठायी असलेली अंतरीची ओढ सामावली आहे). संकलन – **प्रा. डॉ. विजय काळे**
मो.बा.९८२२४५९५७४



मांडवे (ता.नगर) शाळेत दिंडी सोहळ्यात सहभागी झालेले विद्यार्थी.

# मांडवे शाळेत चिमुकल्या वारकऱ्यांचा लक्षवेधी दिंडी सोहळा

नगर – 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' चा जय घोष व हाती टाळ मृदुंग आणि खांद्यावर भगव्या पताका घेतलेल्या चिमुकल्या वारकऱ्यांच्या दिंडी सोहळ्याने सर्वांचे लक्ष वेधले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवे येथे आयोजित करण्यात आलेला ' भव्य दिंडी सोहळा ' मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

शाळेच्या मैदानावरून विठ्ठल –रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन करून या दिंडी सोहळ्याचे प्रस्थान झाले. पारंपारिक वारकरी पोशाखात नटलेले बाल वारकरी डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि त्यांना साथ देणारे गावातील भजनी मंडळ व ग्रामस्थ यांच्यामुळे सोहळ्याला अभूतपूर्व रंगत आली होती. मांडवे येथील सर्व भजनी मंडळी आणि समस्त ग्रामस्थ बंधू – भगिनींनी या सोहळ्याला उपस्थित राहून चिमुकल्यांच्या उत्साह वाढवला. सोहळ्यासाठी शिक्षक म्हस्के, शिक्षिका तांबोळी, गिरवले, टकले तसेच शालेय व्यवस्थापन समितीने परिश्रम घेतले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २४ जुलै रोजी मोफत बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे २४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत बालरोग तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात लहान मुलांच्या आजारांवर निदान, उपचार व शस्त्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले जाईल. नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. सचिन तोडमल, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दीपी अग्रवाल रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये २६ बेडचे अद्ययावत एन.आय.सी.यु., नवजात बाळाच्या श्वासोच्छोवासाच्या त्रासावर उपचार, बाल दमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात बाळाच्या कावीळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा उपलब्ध आहे. अनुवांशिक व जन्मजात आजारांचे निदान, लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे तपासणी, २४ तास पॅथोलॉजी लॅब सेवा उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तपासणी मशीन, २४ तास तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता असून महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येतात.

शिबिरात सुंता शस्त्रक्रिया ७ हजार ५०० रूपये, हायड्रोसील १२ हजार ७०० रूपये, अपेंडिक्स १४ हजार ५०० रूपये, जांघेचा हर्निया १४ हजार रुपये, बेंबीचा हर्निया शस्त्रक्रिया १० हजार ६५० रूपयात करण्यात येणार आहे. औषध खर्च वेगळा असेल. रूग्णांची सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्यावर ५० टक्के सवलत दिली जाईल.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२). मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराच्या अधिक माहितीसाठी ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अर्थजगत

भागभांडवल बाजारात म्हणजेच शेअर मार्केटमध्ये एखाद्या कंपनीचे विश्लेषण करताना प्रवर्तक भागभांडवल म्हणजेच प्रमोटर होल्डिंग हा अत्यंत महत्त्वाचा मापदंड मानला जातो. प्रमोटर होल्डिंग म्हणजे कंपनीच्या एकूण पेड-अप शेअर कॅपिटलपैकी किती टक्के हिस्सा हा कंपनीच्या प्रवर्तकांकडे किंवा त्यांच्या समूहाकडे आहे, याचे थेट प्रमाण होय. भारतीय बाजारपेठेत नियामक मंडळ म्हणजेच सेबीच्या नियमांनुसार दर तिमाहीला कंपन्यांना आपले शेअरहोल्डिंग पॅटर्न जाहीर करणे बंधनकारक असते, ज्यामध्ये प्रमोटर होल्डिंगची सविस्तर माहिती दिली जाते.

## ‘प्रमोटर होल्डिंग’चे महत्त्व



■ गुंतवणूक

गुंतवणूकदारांसाठी प्रमोटर होल्डिंग हा केवळ एक आकडा नसून, तो कंपनीच्या व्यवस्थापनाचा भविष्यावरील विश्वासाचा थेट संकेत असतो. जेव्हा कंपनीत प्रवर्तकांचा हिस्सा मोठा असतो, तेव्हा त्यांचे हित आणि सामान्य गुंतवणूकदारांचे हित एकमेकांशी जोडलेले राहते. व्यवस्थापनाकडे स्वतःचे शेअर्स जास्त असल्यामुळे कंपनीच्या प्रगतीचा थेट फायदा त्यांना मिळतो आणि नुकसान झाल्यास त्याचा फटकाही त्यांनाच बसतो, ज्याला आर्थिक भाषेत ‘स्किन इन द गेम’ असे म्हटले जाते. जर एखाद्या कंपनीत प्रमोटर होल्डिंग सातत्याने वाढत असेल किंवा स्थिर असेल, तर व्यवस्थापनाला कंपनीच्या आगामी कामगिरीबद्दल आणि नफ्याबद्दल मोठी खात्री आहे, असा सकारात्मक संदेश बाजारात जातो. याउलट, जर प्रवर्तक आपले शेअर्स खुल्या बाजारात सातत्याने विकत असतील, तर ते कंपनीसमोरील अंतर्गत अडचणी किंवा आर्थिक दबावाचे संकेत असू शकतात.

सामान्यतः ४० ते ६० टक्के प्रमोटर होल्डिंग हे नियंत्रण आणि बाजारातील तरलता म्हणजेच फ्री फ्लोट या दोन्ही दृष्टीने उत्तम मानले जाते. जर हे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर कंपनीवरील नियंत्रण अतिशय मजबूत असते, परंतु बाजारात शेअर्सची संख्या कमी असल्याने चढ-उतार वेगाने होऊ शकतात. जर प्रमोटर होल्डिंग २० टक्क्यांपेक्षा कमी असेल, तर व्यवस्थापकीय नियंत्रण विखुरलेले असते आणि अशा कंपन्यांवर संस्थात्मक गुंतवणूकदारांचे लक्ष असणे अधिक गरजेचे असते. अर्थात, आयटी किंवा नवीन युगातील तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात अनेकदा गुंतवणूक गोळा केल्यामुळे प्रमोटर होल्डिंग कमी असू शकते, तर जुन्या पारंपरिक कौटुंबिक उद्योगांमध्ये ते अधिक असते.

प्रमोटर होल्डिंगचा अभ्यास करताना केवळ टक्केवारी न पाहता शेअर्स गहाण ठेवण्याचे प्रमाण म्हणजेच शेअर्स प्लेजिंग तपासणे अत्यंत क्लिष्ट आणि महत्त्वाचे ठरते. प्रवर्तक अनेकदा व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी किंवा इतर कारणांसाठी आपले शेअर्स बँका किंवा वित्तीय संस्थांकडे गहाण ठेवून कर्ज घेतात. जर शेअर्स गहाण ठेवण्याचे प्रमाण एकूण होल्डिंगच्या २० ते ३० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर तो गुंतवणूकदारांसाठी धोक्याचा इशारा मानला जातो. बाजारात अनपेक्षित घसरण झाल्यास किंवा मार्जिन कॉल ट्रिगर झाल्यास, कर्ज देणाऱ्या संस्था हे गहाण ठेवलेले शेअर्स बाजारात विकू शकतात, ज्यामुळे शेअरच्या किमतीत मोठी घसरण होऊन प्रवर्तकांचे नियंत्रण धोक्यात येऊ शकते. म्हणूनच, गुंतवणूकदारांनी केवळ प्रमोटर होल्डिंगच्या उच्च आकड्यावर विसंबून न राहता, कंपनीची मूलभूत आर्थिक स्थिती, कर्ज, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि शेअर्स गहाण ठेवण्याचा कल या सर्वांचा एकत्रित विचार करूनच गुंतवणुकीचा निर्णय घेणे सुरक्षित ठरते.



## पावसाळ्यात वाहनविम्याचे नुतनीकरण करताना...

पावसाळ्यात गाडीचे नुकसान झाल्यास नेहमीची कॉम्प्रेहेंसिव्ह (सर्वसमावेशक) कार इन्शुरन्स पॉलिसी सर्व प्रकारचा खर्च कव्हर करेलच असे नाही.विम्याचे नूतनीकरण (रिन्युअल) करताना काही महत्त्वाचे ॲड-ऑन्स (अतिरिक्त कव्हरेज) घेतल्यास पावसाळ्यात होणाऱ्या मोठ्या आर्थिक नुकसानीपासून स्वतःचा बचाव करता येतो.

**१. इंजिन प्रोटेक्ट कव्हर**

पूर किंवा रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे गाडीच्या इंजिनमध्ये पाणी जाण्याचा मोठा धोका असतो. नेहमीच्या पॉलिसीमध्ये इंजिनच्या अंतर्गत भागांचे होणारे असे नुकसान कव्हर केले जात नाही. इंजिन प्रोटेक्ट कव्हर घेतल्यास पाणी शिरल्यामुळे खराब झालेले इंजिनचे अंतर्गत भाग, गिअरबॉक्स आणि ट्रान्समिशन असेंब्ली दुरुस्त करण्याचा किंवा बदलण्याचा खर्च विमा कंपनी उचलते. विशेषतः ज्या शहरांमध्ये पाणी साचण्याची समस्या जास्त आहे, तिथे राहणाऱ्या वाहनधारकांसाठी हा सर्वात महत्त्वाचा पर्याय आहे. तसेच, इलेक्ट्रिक वाहनांच्या बाबतीत बॅटरीच्या संरक्षणासाठीही काही कंपन्या असे विशेष कव्हर देतात.

**२. झिरो डेप्रिसिएशन कव्हर**

साध्या विम्यामधून क्लेम मंजूर झाला तरी जुन्या भागांच्या घसाऱ्यामुळे मिळणारी रक्कम कमी होते आणि प्लास्टिक, रबर किंवा काचेच्या भागांसाठी वाहनधारकाला स्वतःच्या खिशातून पैसे द्यावे लागतात. झीरो डेप्रिसिएशन ॲड-ऑनमुळे हा घसारा पूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात माफ होतो आणि बदलण्यात आलेल्या सुट्या भागांचा पूर्ण खर्च विमा कंपनीकडून मिळतो, ज्यामुळे खिशाला लागणारी कात्री वाचते.


**३. कन्झ्युमेबल्स कव्हर**

गाडीच्या दुरुस्तीदरम्यान इंजिन ऑईल, लुब्रिकंट्स, नट-बोल्ट, स्क्रू आणि फिल्टर्स यांसारख्या ज्या वस्तू एकदा वापरून संपतात, त्यांचा खर्च साधारण क्लेममध्ये मिळत नाही. हे कव्हर घेतलेले असल्यास अशा लहान परंतु आवश्यक गोष्टींचा खर्चही विमा कंपनीकडून परत मिळतो.

**४. रिटर्न टू इन्व्हॉईस**

हा पर्याय प्रामुख्याने नवीन गाड्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरतो. पुरामुळे गाडीचे पूर्ण नुकसान झाले किंवा ती दुरुस्तीच्या पलीकडे गेली , तर सामान्यतः विमा कंपनी गाडीच्या घसाऱ्यानुसार ठरवलेल्या मूल्याच्या (आयडीवी - इन्शुअर्ड डिक्लेअर्ड व्हॅल्यू) आधारे पैसे देते. मात्र, रिटर्न टू इन्व्हॉईस कव्हर असेल, तर गाडी खरेदी करताना जितकी मूळ किंमत होती, त्यामध्ये असणारा रोड टॅक्स आणि रजिस्ट्रेशन चार्जेससह पूर्ण रक्कम परत मिळते. हवामानातील वाढते बदल पाहता, विम्याचे नूतनीकरण करताना फक्त कमी प्रीमियमचा विचार न करता योग्य ॲड-ऑन्सची निवड करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## दुसऱ्याच्या आर्थिक कागदपत्रांमध्ये तुमचे नाव असल्यास...



बँक खाती, मालमत्ता खरेदी किंवा इतर उच्च मूल्याच्या आर्थिक व्यवहारांच्या कागदपत्रांमध्ये केवळ नाव समाविष्ट असल्यामुळे अनेकदा करदात्यांना प्राप्तिकर विभागाकडून नोटिसा किंवा थेट कराच्या मागण्या (टॅक्स डिमांड) येण्याचा मोठा धोका असतो.

■ जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्यात संयुक्त खातेदार (जॉइंट होल्डर) म्हणून सहभागी असते किंवा एखाद्या मालमत्तेच्या खरेदीखतात तिचे नाव समाविष्ट असते, तेव्हा ते सर्व व्यवहार प्राप्तिकर विभागाच्या एआयएस (ॲन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट) मध्ये नोंदवले जातात. यामुळे प्राप्तिकर यंत्रणेला असे वाटते की हा आर्थिक व्यवहार संबंधित व्यक्तीच्या उत्पन्नातून झाला आहे आणि त्यातून कर मागणी उद्भवू शकते.

■ कौटुंबिक सुरक्षिततेसाठी, वारसा नियोजनासाठी किंवा केवळ सुलभतेसाठी पती-पत्नी एकमेकांचे नाव किंवा नातेवाईक आपले नाव मालमत्तेच्या कागदपत्रांवर जोडतात. जर त्या मालमत्तेसाठी लागणारा संपूर्ण निधी किंवा पैसा मुख्य व्यक्तीने दिला असेल आणि दुसऱ्या व्यक्तीचे नाव केवळ नावापुरते असेल, तर त्याला ‘नामधारी मालक’ म्हटले जाते.

■ अशा अनेक प्रकरणांमध्ये आयकर अपीलीय न्यायाधिकरणाने करदात्यांच्या बाजूने निर्णय दिले आहेत. न्यायाधिकरणाने स्पष्ट केले आहे की, केवळ कागदपत्रांवर नाव असल्यामुळे किंवा सोयीसाठी नाव जोडल्यामुळे प्राप्तिकर विभाग कोणत्याही व्यक्तीला थेट कर भरण्यास भाग पाडू शकत नाही. कर आकारणी करताना संबंधित मालमत्तेचा खरा लाभार्थी मालक कोण आहे आणि गुंतवणूक कोणी केली आहे, हे तपासणे विभागासाठी बंधनकारक आहे. जर खऱ्या मालकाने आपल्या कराच्या परताव्यामध्ये तो व्यवहार आधीच दाखवला असेल, तर दुसऱ्या व्यक्तीवर कर आकारता येणार नाही.

### करदात्यांनी कोणती काळजी घ्यावी?

एआयएस नियमित तपासणे: करदात्यांनी आपल्या वार्षिक माहिती पत्रकावर लक्ष ठेवले पाहिजे. जर त्यामध्ये दुसऱ्याच्या व्यवहाराची नोंद आपल्या नावावर दिसत असेल, तर प्राप्तिकर विभागाच्या पोर्टलवर जाऊन त्यावर त्वरित ’अस्वीकृतीचा फीडबॅक’ नोंदवावा. आर्थिक पुरावे संकलित ठेवणे: संबंधित व्यवहाराचा मूळ निधी कुठून आला, याचे बँक तपशील आणि कर भरल्याचे पुरावे कायदेशीर चौकशीच्या वेळी सादर करण्यासाठी नेहमी तयार ठेवावेत.

## युलिप खरेदी करण्यापूर्वी...




युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन अर्थात युलिप खरेदी करण्यापूर्वी, ही योजना तुम्हाला का विकली जात आहे, याचा सखोल विचार करणे अत्यंत गरजेचे असल्याचा इशारा एका महत्त्वपूर्ण अहवालात देण्यात आला आहे. अनेकदा बँक अधिकारी किंवा विमा प्रतिनिधी ग्राहकांच्या खऱ्या आर्थिक गरजांचा विचार न करता, स्वतःचे कमिशन आणि व्यावसायिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी या योजनांचा आग्रह धरतात. विमा आणि गुंतवणूक यांचे एकत्रिकरण असलेली ही योजना वरवर अत्यंत फायदेशीर वाटत असली, तरी त्यामागील छुपे पैलू समजून घेणे आवश्यक आहे.

■ बँका आणि विमा कंपन्यांना युलिपच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणात कमिशन मिळते, हेच या योजना इतक्या आक्रमकपणे विकण्यामागचे मुख्य कारण आहे. विक्री प्रतिनिधींकडून अनेकदा ग्राहकांची दिशाभूल केली जाते आणि ही योजना एखाद्या म्युच्युअल फंडासारखी किंवा मुदत ठेव योजनेपेक्षा उत्तम असल्याचे भासवले जाते. बाजारातील तेजीचा दाखला देत गुंतवणुकीवर आकर्षक परताव्याचे आमिष दाखवले जाते. अनेक वेळा विक्री प्रक्रियेदरम्यान अपेक्षित परतावा अधोरेखित केला जातो; मात्र शुल्क, जोखीम आणि प्रत्यक्ष परताव्याबाबत ग्राहकांनी स्वतः पडताळणी करणे आवश्यक असते.

■ युलिपमध्ये गुंतवणूक करताना ग्राहकांच्या प्रीमियमचा एक मोठा हिस्सा विमा संरक्षण शुल्क, फंड व्यवस्थापन शुल्क आणि पॉलिसी प्रशासकीय शुल्क यासारख्या विविध छुप्या शुल्कांमध्ये कपात केला जातो. यामुळे गुंतवणूकदाराची प्रत्यक्ष गुंतवली जाणारी रक्कम कमी होते आणि साहजिकच मिळणारा परतावा अपेक्षेपेक्षा कमी राहतो. याशिवाय, विमा नियामक मंडळाच्या नियमांनुसार या योजनेत पाच वर्षांचा सक्तीचा लॉक-इन कालावधी असतो, ज्यामुळे आणीबाणीच्या काळात ग्राहकाला आपला निधी काढून घेता येत नाही, ही गुंतवणूकदारांची मोठी अडचण ठरते.

■ आर्थिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, विमा आणि गुंतवणूक यांची सरमिसळ करणे नेहमीच तोट्याचे ठरू शकते. सुरक्षित भविष्यासाठी कमी प्रीमियममध्ये मोठे संरक्षण देणारा शुद्ध मुदत विमा घेणे आणि संपत्ती निर्मितीसाठी म्युच्युअल फंड किंवा इतर बाजारसंलग्न साधनांमध्ये थेट गुंतवणूक करणे हा अधिक सुज्ञपणाचा मार्ग आहे. म्हणूनच, कोणत्याही बँकेत किंवा वित्तीय संस्थेत युलिपचा आग्रह धरला गेल्यास, भूलथापांना बळी न पडता योजनेच्या अटी, नियम आणि सर्व शुल्कांची माहिती बारकाईने पडताळून पाहणे हाच सुरक्षित गुंतवणुकीचा एकमेव मंत्र आहे.

## विम्याच्या हप्त्यासाठी कोणता पर्याय निवडावा?



जीवन विमा पॉलिसी घेताना आपल्यासमोर प्रीमियम म्हणजेच विम्याचा हप्ता भरण्यासाठी प्रामुख्याने दोन पर्याय उपलब्ध असतात, ज्यांना रेग्युलर पे (नियमित हप्ता) आणि लिमिटेड पे (मर्यादित कालावधी हप्ता) म्हटले जाते. या दोन्ही पर्यायांचे आर्थिक गणित आणि त्यांचे फायदे-तोटे स्वतंत्र स्वरूपाचे आहेत.

रेग्युलर पे या पर्यायामध्ये पॉलिसीचा जितका कालावधी असतो, तितकी वर्षे नियमितपणे हप्ता भरावा लागतो. उदाहरणादाखल सांगायचे तर, जर ३० वर्षांच्या मुदतीची पॉलिसी असेल आणि वार्षिक हप्ता २०,००० रुपये असेल, तर पूर्ण ३० वर्षे दरवर्षी २० हजार भरावे लागतील आणि एकूण खर्च सहा लाख रुपये होईल.

■ या पर्यायाचा मुख्य फायदा म्हणजे खर्च दीर्घ कालावधीत विभागला गेल्यामुळे वार्षिक हप्त्याची रक्कम लिमिटेड पेक्षा खूप कमी असते. तसेच इन्कम टॅक्स ॲक्टच्या सेक्शन ८०सी अंतर्गत दरवर्षी मिळणाऱ्या कर सवलतीचा लाभही दीर्घकाळ घेता येतो.

■ दुसऱ्या बाजूला, लिमिटेड पे या पर्यायामध्ये विम्याचे कवच पूर्ण कालावधीसाठी मिळते, परंतु हप्ते मात्र एका ठराविक आणि कमी कालावधीतच भरून पूर्ण करायचे असतात. जर ३० वर्षांच्या पॉलिसीसाठी १० वर्षांचा लिमिटेड पे निवडला, तर वार्षिक हप्ता कदाचित ५०,००० रुपये असू शकतो. येथे तुम्हाला फक्त पहिली १० वर्षेच हप्ते भरावे लागतील, ज्याचा एकूण खर्च ५,००,००० रुपये होईल आणि उर्वरित २० वर्षे एकही रुपया न भरता विम्याचे संरक्षण सुरू राहील.

■ ज्यांचे उत्पन्न अनिश्चित आहे किंवा ज्यांना भविष्यात नोकरीत बदल अथवा उत्पन्नात घट होण्याची शक्यता वाटते, त्यांच्यासाठी हा पर्याय योग्य ठरतो कारण सुरुवातीलाच हप्ते संपत असल्यामुळे पुढे पॉलिसी खंडित होण्याचा धोका नसतो. वरवर पाहता लिमिटेड पे मध्ये एकूण कमी पैसे भरावे लागत असल्यामुळे तो स्वस्त वाटू शकतो, परंतु ‘नेट प्रेझेंट व्हॅल्यू’ (पैशांचे आजचे मूल्य) आणि महागाईचा दर विचारात घेतल्यास चित्र पूर्णपणे बदलते. महागाईमुळे भविष्यातील पैशांची किंमत कमी होत जाते. वार्षिक ५% महागाई दर गृहीत धरल्यास, रेग्युलर पे मधील ३० व्या वर्षी भराव्या लागणाऱ्या २०,००० रुपयांचे आजचे मूल्य केवळ ४,६२७ रुपयांच्या आसपास असते. पाच टक्के महागाई दरानुसार एकूण भरलेल्या हप्त्यांचे आजचे निव्वळ मूल्य (एनपीव्ही) काढल्यास रेग्युलर पे ची एनपीव्ही साधारण ३,०७,५०० रुपये भरते, तर लिमिटेड पे ची एनपीव्ही साधारण ३,८६,००० रुपये भरते. या गणितानुसार लिमिटेड पे हा आर्थिकदृष्ट्या अधिक महाग पडतो, कारण यामध्ये अधिक मूल्य असलेले पैसे सुरुवातीच्या वर्षांतच मोठ्या प्रमाणात कंपनीकडे जमा होतात. योग्य पर्यायाची निवड ही पूर्णपणे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते. जर तुमचे उत्पन्न स्थिर असेल, तर रेग्युलर पे निवडणे अधिक फायदेशीर ठरते आणि यामुळे दीर्घकाळ कर नियोजनाचा लाभही उठवता येतो. याउलट, जर तुम्ही लवकर निवृत्ती घेण्याचा विचार करत असाल किंवा उत्पन्नाची शाश्वती नसेल, तर मर्यादित कालावधीत सर्व हप्ते चुक्ते करून मानसिक शांतता मिळवण्यासाठी लिमिटेड पे हा पर्याय सोयीचा ठरू शकतो.

## सद्यस्थितीत बाजारात पैसा गुंतवावा का?



भारतीय शेअर बाजार काही तिमाहींपूर्वीच्या तुलनेत निश्चितच अधिक सुदृढ आणि स्थिर झाला आहे, परंतु तो अजूनही पूर्णपणे चिंतामुक्त किंवा धोक्याबाहेर आलेला नाही. बाजारामध्ये झालेल्या मूल्यात्मक सुधारणांमुळे अनपेक्षित पडझडीची तीव्रता कमी झाली असली, तरी जागतिक आणि देशांतर्गत पातळीवरील आव्हाने अद्याप संपलेली नाहीत.

गेल्या काही तिमाहींमध्ये भारतीय बाजाराने मोठा चढ-उतार पाहिला आहे. अनेक मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समधील अतिरिक्त उत्साह कमी होऊन त्यांचे मूल्यांकन आता काहीसे वाजवी पातळीवर आले आहे, ज्यामुळे बाजाराची रचना आधीपेक्षा अधिक निरोगी झाली आहे.

देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांचा म्हणजेच डीआयआयचा सातत्यपूर्ण ओघ आणि किरकोळ गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास यांमुळे बाजाराला खालच्या पातळीवर मजबूत आधार मिळाला आहे. कंपन्यांच्या नफ्यातील वाढीनेही अर्थव्यवस्थेच्या पायाभूत मजबुतीला प्रमाणित केले आहे.

असे असूनही बाजार पूर्णपणे सुरक्षित न ठरण्यामागे काही प्रमुख कारणे आहेत. जागतिक पातळीवरील भू-राजकीय तणाव आणि पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा यांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अनिश्चितता कायम आहे. त्याचप्रमाणे, महागाईचा वाढता आलेख आणि मध्यवर्ती बँकांचे व्याजदरांबाबतचे कडक धोरण या घटकांचा बाजाराच्या मानसिकतेवर सातत्याने दबाव दिसून येत आहे. काही विशिष्ट क्षेत्रांमधील शेअर्सचे मूल्यांकन अजूनही ऐतिहासिक सरासरीपेक्षा अधिक असल्याने, तेथे नवीन गुंतवणुकीसाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी काही क्षेत्रे अत्यंत आशादायक वाटत आहेत. केंद्र सरकारच्या प्रोत्साहनपर धोरणांमुळे भारतीय उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळत असून, जागतिक कंपन्यांकडून भारताला प्राधान्य दिले जात आहे. बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्राची कामगिरी देखील सुधारली असून, बँकांच्या ताळेबंदातील अनुत्पादित कर्जांचे प्रमाण घटले आहे. याशिवाय, पायाभूत सुविधा आणि कॅपिटल गुडस् क्षेत्रातील कंपन्यांना मिळणाऱ्या ऑर्डरचे प्रमाण पाहता, आगामी काळात या क्षेत्रांमध्ये शाश्वत वाढ होण्याची शक्यता आहे.

एकंदरीत विचार करता, भारतीय शेअर बाजाराची दीर्घकालीन वाटचाल सकारात्मक असली, तरी सध्याच्या टप्प्यावर गुंतवणूकदारांनी अतिउत्साहात येऊन मोठी एकरकमी गुंतवणूक करणे टाळले पाहिजे. बाजारातील संभाव्य चढ-उतारांचा लाभ घेण्यासाठी चांगल्या कंपन्यांमध्ये पद्धतशीर गुंतवणूक म्हणजेच एसआयपीच्या माध्यमातून हळूहळू भांडवल वाढवणे हाच सध्याच्या काळातील सर्वात सुरक्षित आणि शहाणपणाचा मार्ग ठरेल.

## समान वेतन असूनही दोन व्यक्तींना सारखेच कर्ज का मिळत नाही?

अनेकदा असे दिसून येते की, एकाच कंपनीत काम करणाऱ्या आणि अगदी समान वेतन असणाऱ्या दोन सहकाऱ्यांपैकी एकाला बँक सहज मोठे कर्ज मंजूर करते, तर दुसऱ्याला मात्र कमी रकमेच्या कर्जावर समाधान मानावे लागते किंवा त्याचे कर्ज नाकारले जाते. केवळ मासिक वेतन सारखे आहे म्हणजे बँकेकडून मिळणारी कर्जाची रक्कमही सारखीच असेल, हा एक मोठा गैरसमज आहे. मनीकंट्रोलच्या वैयक्तिक वित्त अहवालानुसार, बँका कर्ज मंजूर करताना केवळ वेतनाचा आकडा पाहत नाहीत, तर त्यामागे अनेक महत्त्वाचे आर्थिक आणि वैयक्तिक निकष तपासले जातात.

या फरकाचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे संबंधित व्यक्तीचा सिबिल स्कोअर आणि तिची पतविषयक पार्श्वभूमी होय. जरी दोन्ही व्यक्तींचे वेतन समान असले, तरी एका व्यक्तीने जर पूर्वी घेतलेल्या कर्जांचे हप्ते आणि क्रेडिट कार्डची बिले वेळेवर भरली असतील, तर तिचा सिबिल स्कोअर उत्तम असतो. याउलट, दुसऱ्या व्यक्तीने हप्ते भरण्यात दिरंगाई केली असल्यास तिचा स्कोअर कमी असतो. बँक कर्ज देण्यापूर्वी ग्राहकाची पत आणि विश्वासार्हता तपासण्यासाठी या निनिर्देशांकाला सर्वोच्च प्राधान्य देते, ज्यामुळे कर्जाच्या रकमेत आणि व्याजदरात मोठा फरक पडतो.

दुसरे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे सध्या सुरू असलेली इतर कर्जे आणि फॉइर (फिक्स्ड ऑब्लिगेशन टू इन्कम रेशो) हा निकष होय. बँका कर्ज देताना ग्राहकाच्या हातात दरमहा किती निव्वळ उत्पन्न उरते हे पाहतात. जर पहिल्या व्यक्तीवर आधीच कोणतेही कर्ज नसेल, तर तिच्या वेतनाचा मोठा हिस्सा नवीन कर्जाचा हप्ता भरण्यासाठी उपलब्ध असतो. परंतु, जर दुसऱ्या व्यक्तीच्या वेतनातील पन्नास टक्क्यांहून अधिक हिस्सा आधीच गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा क्रेडिट कार्डच्या हप्त्यांमध्ये जात असेल, तर बँक तिला नवीन मोठे कर्ज देण्यास नकार देते. याशिवाय, रोजगाराचे स्वरूप आणि काम करत असलेल्या संस्थेचा दर्जा देखील तितकाच महत्त्वाचा ठरतो. दोन्ही व्यक्तींचे वेतन समान असले, तरी एक व्यक्ती जर अत्यंत स्थिर आणि नामांकित कॉर्पोरेट कंपनीत कायमस्वरूपी नोकरीला असेल आणि दुसरी व्यक्ती एखाद्या नवोदित स्टार्टअपमध्ये किंवा कंत्राटी पद्धतीवर काम करत असेल, तर बँकेच्या दृष्टीने पहिल्या व्यक्तीच्या नोकरीतील जोखीम कमी असते. तसेच, अर्जदाराचे वय आणि कर्ज फेडण्यासाठी मिळणारा कालावधी म्हणजेच कार्यकाळ यावरही कर्जाची पात्रता ठरते. २५ वर्षांच्या तरुणाला कर्ज फेडण्यासाठी जितका मोठा कालावधी मिळू शकतो, तितका तो ५० वर्षांच्या व्यक्तीला मिळत नाही.




थोडक्यात सांगायचे तर, कर्ज मिळणे हे केवळ तुमच्या मासिक वेतनावर अवलंबून नसून तुमच्या एकूण आर्थिक शिस्तीवर, सध्याच्या दायित्वांवर आणि पतविषयक इतिहासानुरूप ठरत असते. त्यामुळे समान वेतन असूनही प्रत्येकाची कर्ज घेण्याची क्षमता पूर्णपणे भिन्न असू शकते.

# ५ गावठी कट्टे विक्रीसाठी आलेल्या दोघांना पकडले

### स्थानिक गुन्हे शाखेची शेंडी बायपासवर कारवाई

नगर – शहरात विक्रीसाठी आणलेले ५ गावठी कट्टे आणि एक स्कोडा कारसह १० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेने हस्तगत केला असून, दोन रेकॉर्डवरील गुन्हेगारांना जेरबंद करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणारा शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन करत रवाना केले होते.



गावठी कट्टे विक्रीसाठी आणलेल्या आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

१९ जुलै रोजी हे पथक एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पिंटू उर्फ भाऊ आनंदराव सगळमारे (रा. सगळमारेवाडी, निघोज, ता. पारनेर) आणि बंटी उर्फ स्वप्नील विभूषण पाबळे (रा. कावडी पिंपळगाव, ता. जुन्नर, जि. पुणे) हे दोघेजण त्यांच्या ताब्यातील गावठी कट्टे विक्री करण्यासाठी एमआयडीसी डेअरी चौक ते शेंडी बायपास रोडवर एका सिल्व्हर रंगाच्या कारमध्ये थांबले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तात्काळ वडगाव गुप्ता शिवारामध्ये सापळा रचून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

ताब्यातील व्यक्तींची व वाहनाची झडती घेतली असता त्यांच्याकडून २ लाख ५० हजार रुपये किमतीचे ५ गावठी पिस्तूल, ४० हजार रुपयांचे २ मोबाईल आणि ८ लाख रुपयांची एक स्कोडा कार असा एकूण १० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशी दरम्यान पिंटू सगळमारे याने ही शस्त्रे भैय्या उर्फ ऋषिकेश सुभाष भोसले (रा. ता. जि. धाराशिव) याच्याकडून विकत घेतल्याचे सांगितले. आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेला आरोपी पिंटू सगळमारे याच्यावर पारनेर आणि शिर्डी पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, कृष्णकुमार सेदवड, पोलीस अंमलदार अतुल लोखंडे, गणेश लोंढे, राहुल द्वारके, शाहिद शेख, किशोर शिरसाठ, मनोज साखरे, रोहित येमुल, प्रशांत राठोड, प्रकाश मांडगे आणि चालक अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

# सावन कृपाल रुहानी मिशनच्या शिबिरात कर्तव्य बजावत अडीचशे दात्यांचे रक्तदान



सावन कृपाल रुहानी मिशनच्या शिबिरात रक्तदान करताना जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप.

नगर – शहरातील मिस्कीन मळा येथील सावन कृपाल रुहानी मिशनच्या कृपाल आश्रमात आयोजित रक्तदान शिबिरास दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात सुमारे २५६ दात्यांनी रक्तदानाचे कर्तव्य बजावले आहे. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांनी स्वतः रक्तदान करून या शिबिराचे उद्घाटन केले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महापौर ज्योती गाडे, उद्योजक अमोल गाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिक व महिलांनी शिबिरात सहभाग घेत शुभेच्छा दिल्या, अशी माहिती अहिल्यानगर सावन कृपाल रुहानी मिशनचे अध्यक्ष शामलाल छाबरिया यांनी दिली.

यावेळी सचिन जगताप म्हणाले, रक्ताची पूर्तता केवळ रक्तदानाने पूर्ण होत असल्याने हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. याच भावनेने मीही वेळोवेळी रक्तदानाचे कर्तव्य बजावत आहे. सावन कृपाल रुहानी मिशनचा रक्तदान शिबिराचा उपक्रम समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, सामाजिक कार्यासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

प्रास्ताविकात आश्रमाचे सचिव सुशील बजाज यांनी उपक्रमाची माहिती देऊन सर्वांचे स्वागत केले. अनिलकुमार बजाज, सुनील मिस्कीन, शिवकुमार छाबरिया यांच्यासह सेवेकारी व महिला सदस्यांनी शिबीर यशस्वीतेसाठी नियोजन केले. या शिबिरात जनकल्याण रक्तकेंद्र, आनंदऋषीजी ब्लड बँक, अष्टविनायक रक्तपेढी व सिव्हील हॉस्पिटलच्या रक्तपेढ्यांनी रक्त संकलनाचे कार्य केले.

# उपवर्गीकरणाविरोधात बौद्ध समाजाचा ९ ऑगस्ट क्रांती दिनी मोर्चाचे आयोजन



नगर – अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण, संविधान–विरोधी धोरणे आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत होणाऱ्या अपमानास्पद वक्तव्यांच्या निषेधार्थ ९ ऑगस्ट क्रांती दिनी मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अवमान करणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना जशास तसे उत्तर दिले जाईल. तसेच संविधान बचाव, सामाजिक ऐक्य आणि अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या धोरणाविरोधात हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

यावेळी न्यायालयीन बंदर समितीचा अहवाल मुख्यमंत्री यांनी तातडीने सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जातींतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याचे कटकारस्थान भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित घटकांकडून उपवर्गीकरणाच्या माध्यमातून रचले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. आरक्षणातील १३ टक्के हक्क कमी करण्याचा आणि संविधानात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही समाजाविरोधात नसून मनुवादी विचारसरणी आणि सरकारच्या धोरणांविरोधात आहे. मातंग समाज हा आमचा बंधूच आहे. आमचा संघर्ष समाजात फूट पाडणाऱ्या प्रवृत्तींविरोधात असून कोणत्याही समाजाविरोधात नाही, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवारातील एखाद्या सदस्याला मोर्चासाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहितीही देण्यात आली.

मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावात बौद्ध युवकांचे गट तयार करण्यात येणार असून तरुण, ज्येष्ठ नागरिक व महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रचार आणि जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील समाजबांधवांनी सहभागी होऊन मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात आले.

९ ऑगस्ट रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चास प्रारंभ होणार असून नीलक्रांती चौक येथे सभेने त्याचा समारोप करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# वारीच्या भक्तिमय वातावरणात नेत्रदान–अवयवदानाचा जागर

### फिनिक्स सोशल फाऊंडेशन व जिल्हा रुग्णालयाचा अनोखा उपक्रम; दिंडीतून अवयवदान जनजागृती



फिनिक्स सोशल फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाच्या अवयवदान समुपदेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली.

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाच्या अवयवदान समुपदेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवयवदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. शहरातील प्रमुख मार्गांवरून जाणाऱ्या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या हातात नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व सांगणारे जनजागृतीपर फलक व बॅनर देण्यात आले होते. अवयवदान हेच श्रेष्ठ दान, नेत्रदानाने अंधांच्या जीवनात प्रकाश फुलवा, मरणोत्तर अवयवदानातून अनेकांना नवे जीवन मिळू शकते अशा संदेशांद्वारे नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करण्यात आले.

दिंडी मार्गावरील नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अवयवदानाविषयी माहिती जाणून घेतली. अनेकांनी अवयवदानाबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. धार्मिक आणि सामाजिक संदेशाची सांगड घालत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

या जनजागृती मोहिमेत फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे तसेच अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाचे अवयवदान समुपदेशक सतीश आहिरे यांनी वारकऱ्यांसोबत सहभाग नोंदवत नागरिकांना अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

जालिंदर बोरुडे म्हणाले, अवयवदान आणि नेत्रदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा आहे. एका व्यक्तीच्या मरणोत्तर अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, तर नेत्रदानामुळे अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होतो. धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमधून जनजागृती केल्यास हा संदेश मोठ्या प्रमाणावर समाजापर्यंत पोहोचतो. प्रत्येक नागरिकाने अवयवदानाचा संकल्प करून आपल्या कुटुंबीयांनाही त्याबाबत माहिती देण्याचे त्यांनी आवाहन केले.

जिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक सतीश आहिरे म्हणाले की, अवयवदानाबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज आहेत. योग्य माहिती आणि जनजागृतीद्वारे हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. अवयवदानामुळे अनेक गंभीर रुग्णांना जीवनदान मिळू शकते. प्रत्येकाने अवयवदानाबाबत सकारात्मक विचार करून शासनाच्या अधिकृत प्रक्रियेनुसार नोंदणी करावी. अशा जनजागृती मोहिमा समाजात मोठा सकारात्मक बदल घडवून आणता येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# लोकसहभागातून वाडिया पार्क–टिळक रोड दुभाजकात एक हजार बोगनवेल वृक्षांची लागवड

### विविध रंगांच्या फुलांनी बहरणार टिळक रोड; हरित व सुंदर शहराच्या दिशेने आणखी एक पाऊल

नगर – हरित, स्वच्छ आणि सुंदर शहर घडविण्याच्या उद्देशाने वाडिया पार्क–टिळक रोड मार्गावरील दुभाजकांमध्ये लोकसहभागातून तब्बल एक हजार बोगनवेल वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षांना भविष्यात विविध रंगांची फुले येणार असल्याने संपूर्ण टिळक रोड परिसर आकर्षक आणि नयनरम्य होणार असून शहराच्या सुशोभीकरणात भर पडणार आहे.

या वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, उपक्रमाचे प्रमुख संयोजक गोरख पडोळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, वैभव जगताप, चैतन्य घुले, संयम शेटीया, संजय कडूस, कांतीसेठ पटेल, तुषार मुथा, परेश दिवाणी, जेठासेठ पटेल, पुरुषोत्तम पटेल, हंसराज पटेल, निलेश पटेल, नरसीभाई पटेल, जगदीश पटेल, लालाशेठ पटेल, राकेश सोनीमंडलेचा, अमित बुरा, प्रीतम तोडकर, हिरा खूबचंदानी, अरुण जाधव, दिलीप जाधव, अतुल जाधव, सिद्धांत जाधव, अक्षय गाडळकर, विकी कानडे, गौरव शेरकर, मनीष फुलडाळे, संतोष टेके, संजय जंजाळे, धीरज पडोळे, अशोक गाडळकर, कुमार गाडळकर, किरण कानडे, रितेश कानडे, सोमनाथ कानडे, नंदू एकाडे, दिनेश टेकाडे, नितीन एकाडे, विशाल एकाडे, सखाराम जाधव, सचिन दळवी, मनोज लाटे, पोपट निमसे, स्वप्निल घुले, राजू पाचरणे, बाबू पाचरणे, बाबासाहेब गाडळकर, विजय फुगारे, केतन गुंदेचा, संजय पडोळे, गणेश गाडळकर, गोरक्ष पडोळे आदी उपस्थित होते.



टिळक रोडवरील दुभाजकात वृक्षारोपणप्रसंगी आ.संग्राम जगताप, सुरेश बनसोडे, गोरख पडोळे, दत्ता गाडळकर आदी.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, शहरातील डीपी रस्त्यांचे काँक्रिटीकरण मोठ्या प्रमाणावर पूर्ण झाले असून वाडिया पार्क–टिळक रोड हा त्यातील महत्त्वाचा रस्ता आहे. रस्ता पूर्ण झाल्यानंतर त्याच्या दुभाजकात लोकसहभागातून एक हजार बोगनवेल वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. काही वर्षांत हा संपूर्ण रस्ता विविध रंगांच्या फुलांनी बहरलेला दिसेल आणि परिसराला आकर्षक, सुशोभित स्वरूप प्राप्त होईल. लोकसहभागाशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होऊ शकत नाही. अहिल्यानगरमध्ये वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ सर्वप्रथम माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी सुरू केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी या उपक्रमाला गती दिली आणि आता महापालिकेचे उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून हरित शहर उभारण्याचा संकल्प हाती घेतला आहे. त्याच चळवळीचा भाग म्हणून गोरख पडोळे यांनी पुढाकार घेत नागरिकांना एकत्र आणून हा उपक्रम यशस्वी केला आहे.

ते पुढे म्हणाले की, वाढते प्रदूषण, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास आणि महानगरांप्रमाणे वाढणारे श्वसनाचे आजार ही चिंतेची बाब आहे. नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी वृक्षारोपण व त्याहून महत्त्वाचे म्हणजे वृक्षसंवर्धन हाच एकमेव प्रभावी पर्याय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपक्रमाचे संयोजक गोरख पडोळे म्हणाले की, वाडिया पार्क–टिळक रोड हा शहरातील प्रमुख आणि अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्याने पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या पूर्णपणे दूर झाली आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी परिसरातील नागरिकांना एकत्र करून टिळक रोडच्या दुभाजकात एक हजार बोगनवेल वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारली आहे. बोगनवेलच्या विविध रंगांच्या फुलांमुळे हा रस्ता भविष्यात शहरातील मॉडेल रोड म्हणून ओळखला जाईल आणि परिसराला वेगळी ओळख मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले, प्रभाग क्रमांक १३ मध्ये विकासकामांसोबत सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनसहभागाचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत. स्वच्छ, सुंदर आणि हरित प्रभाग अशी स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली विकासकामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात असून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची ही चळवळ प्रत्येक नागरिकाने आपली समजून पुढे नेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिक्षकांना 'कॉम्प्युटेशनल थिंकिंग' तसेच 'कौशल्य विकासा'चे प्रशिक्षण



अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत सहभागी झालेले शिक्षक.

नगर – अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्स (एएसएससी) यांच्या वतीने सदस्य सीबीएसई शाळांतील शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी 'कॉम्प्युटेशनल थिंकिंग' आणि 'कौशल्य विकास' या विषयांवरील जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील १९ सीबीएसई शाळांमधील ६५ हून अधिक शिक्षक आणि १२ मुख्याध्यापकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शिक्षकांना कॉम्प्युटेशनल थिंकिंग आणि कौशल्य विकास या संकल्पना विद्यमान अभ्यासक्रमात प्रभावीपणे समाविष्ट करून अध्यापन अधिक परिणामकारक, अनुभवाधारित आणि क्षमता–केंद्रित कसे करता येईल, याविषयी कार्यशाळेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक असलेल्या अध्यापन पद्धती, उपक्रम आणि कृतीशील तंत्रांची माहिती यावेळी देण्यात आली.

लॉजिकिड्स आणि लेंड अ हँड इंडिया या संस्थांतील तज्ज्ञ संसाधन व्यक्तींनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यांनी अभ्यासक्रमाच्या चौकटीचे सविस्तर स्पष्टीकरण देत प्रत्यक्ष वर्गात सहज राबविता येतील अशा नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, कृतीआधारित उपक्रम, प्रभावी उदाहरणे आणि अंमलबजावणीची विविध मॉडेल्स सादर केली.

प्रारंभी अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सच्या अध्यक्षा दीपिका नगरवाला यांनी सांगितले की, कोणत्याही शैक्षणिक बदलाचे खरे शिल्पकार शिक्षकच असतात. नवीन अभ्यासक्रम हा अतिरिक्त भार न समजता, तो विद्यमान अभ्यासक्रमात प्रभावीपणे समाविष्ट केल्यास अध्यापन अधिक अर्थपूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित होऊ शकते. ही कार्यशाळा अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सच्या सचिव नम्रता ओहरी यांच्या यजमानपदाखाली डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन्स इंग्लिश मीडियम स्कूल येथे पार पडली.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी कोषाध्यक्षा नूतन मिश्रा यांनी लॉजिकिड्स आणि लेंड अ हँड इंडिया यांच्या संसाधन व्यक्तींचा सत्कार करून त्यांच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले.

या उपक्रमाचे सीबीएसई जिल्हा समन्वयक जयश्री मेहेत्रे, सीबीएसई जिल्हा प्रशिक्षण समन्वयक अशोक सचदेव यांनी विशेष कौतुक केले. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अशा क्षमता–वृद्धी कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. समारोपावेळी सहभागी शिक्षकांनी या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष अध्यापनात प्रभावीपणे वापरण्याचा संकल्प व्यक्त केला.

# आरोग्यवर्धिनी योग व निसर्गोपचार संस्थेचा १०० टक्के निकाल

नगर – येथील आरोग्यवर्धिनी योग व निसर्गोपचार संस्था संचलित तथा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मान्यताप्राप्त एम. ए. योग (प्रथम व द्वितीय वर्ष) अभ्यासक्रमाचा निकाल नुकताच जाहीर झाला असून संस्थेने १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.

या निकालामध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थिनी प्रणिता तरोटे हिने प्रथम क्रमांक मिळवून संस्थेचा गौरव वाढविला आहे. तसेच डॉ. दीपराज वाघुळे, दिप्सीका कराचीवाला आणि डॉ. स्वाती समुद्र यांनीही यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे शिक्षक मयूर कांगणे, ज्योती चोपडे, सफिया लोखंडे, हेमा शेलोट शैलजा घुले आणि ऋतुजा गिते यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेच्या अध्यक्षा हेमंगिनी पोतनीस मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना भविष्यात अधिक प्रगती करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित केले.

संस्थेच्या या शंभर टक्के निकालामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेच्या सर्व पदाधिकार्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे व नवीन वर्षासाठी एम. ए. योगा डिप्लोमा योगा अ‍ॅंड इन नॅचरोपॅथी या कोर्ससाठी अ‍ॅडमिशन सुरू झाले आहेत. तसेच पुढील कोर्सची माहिती मिळवण्यासाठी ९४२२०७३५९०, ८२०८५२६४०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# आनंदऋषीजी योगा सेंटर

### आनंदयोग मधील योग साधकांचे अभिप्राय

मी जानेवारी २०२६ पासून आनंदऋषीजी योग केंद्रामध्ये नियमित योगाभ्यास करत आहे.

या कालावधीत योगाने माझ्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. सुरुवातीला योग हा केवळ व्यायामाचा एक प्रकार वाटत होता, परंतु आज तो माझ्या दैनंदिन जीवनाचा महत्वाचा भाग बनला आहे. नियमित योगाभ्यासामुळे माझी शारिरीक तंदुरुस्ती वाढली, शरीर अधिक लवचिक झाले आणि मानसिकदृष्ट्याही मी अधिक शांत, एकाग्र व सकारात्मक झाले आहे.

आनंदऋषीजी योग केंद्राचे वातावरण अतिशय प्रसन्न, शिस्तबध्द आणि प्रेरणादायी आहे. येथे प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष देऊन मार्गदर्शन केले जाते. माझे योग प्रशिक्षक अनिल मेहेर सर यांनी मला योगातील विविध आसने, प्राणायाम आणि ध्यान यांचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या संयमी व प्रभावी अध्यापन पध्दतीमुळे योग शिकणे सोपे झाले. ते प्रत्येक विद्यार्थ्याला प्रोत्साहन देतात आणि योग्य पध्दतीने योगाभ्यास करण्यासाठी सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास वाढला आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्याची प्रेरणा मिळाली.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात योग प्रत्येकासाठी अत्यंत उपयुक्त आहे. योगामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत राहते आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी नियमित योगाभ्यास करणे आवश्यक आहे.



आनंदऋषीजी योग केंद्र आणि श्री. अनिल मेहेर सर यांच्या मार्गदर्शनामुळे मला निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवन जगण्याची दिशा मिळाली आहे. या योग प्रवासासाठी मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे.

**– मंगल आंबेकर,**
बुरुडगाव रोड, अहिल्यानगर

